# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५८**

MAHMAR 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.
दिशा
वर्ष दुसरे / अंक ७ / जून २००२

## संपादकीय

### ऋतु

पावसाळ्याबरोबर नवीन वर्ष सुरू होईल. नवीन आशा, नवीन स्वप्न.... वातावरणात नावीन्याचा एक वेगळा अनुभव भरून राहिलेला जाणवेल. या शैक्षणिक वर्षा बद्दल चांगल चिंतीत असतानाच, पावसाळ्यातील रोगराईचे अनुभव मनाला उद्विग्न करतात. कोठेही थुंकण्याची सवय असणारी माणस, भेसळीचे अन्न विकणारी माणसं, प्रदूषण वाढविणारी माणसं पावले पावली भेटली की लहानपणी पावसाबद्दल वाचलेली सारी गोडंस वर्णन खोटी वाटायला लागतात.

बेवारशी कुत्री चावल्याच्या हजारो घटना घडल्याची बातमी या पार्श्वभूमीवर वाचावी आणि हे असंच चालू रहणारं. असंच चालू आहे या विचारानं निराशा आली. बेवारशी गुरे, कुत्री यांचा प्रश्न, थुंकण्याच्या सवयीचा प्रश्न ...... मग प्रश्नांचं मोठं चक्रव्यूह तयार होतं आणि ...... पावसाळा, माझा नावडता ऋतु ठरायला लागतो. सहलीला गेलो तर तेथे वेगळीच चित्रं अनुभवास येतात...

तरीही आशा पल्लवित करायचा. एकना एक दिवस स्वच्छ पाऊस आपण अनुभवू असं स्वप्न पहायचं... तमसो मां ज्योतिर्गमय म्हणण्याचं...




वर्ष दुसरे / अंक ७ / जून २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ ९२ ९९
५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमद्भगवत् गीता (अध्याय ३ रा) ॥ कर्म योग ॥ | आशा भिडे | ३ |
| २) | श्रीमत् आद्य शंकराचार्य यांचा मायावाद व आधुनिक विज्ञान | श्री. शं. वा. मठ | ८ |
| ३) | नारायण मूर्ती - एक टेक्नोवादळ | श्री. अनिल शालिग्राम | १४ |
| ४) | चिंता | श्री. सुरेश देशपांडे | २२ |
| ५) | मुक्काम नाणेघाट | श्री. भालचंद्र बापट | २४ |
| ६) | ग्रंथालय व माहिती शास्त्र | प्रा. मोहन पाठक | २६ |
| ७) | पारिभाषिक शब्दांचा अर्थ | | २८ |
| ८) | उपयुक्त माहिती | | ३२ |
| ९) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्रीमद्‌भगवत्‌ गीता (अध्याय ३ रा) ॥ कर्मयोगः ॥

*गीतेच्या दुसऱ्या अध्यायावरील लेखानंतर कर्म योग या तिसऱ्या अध्यायावर श्री. भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. - संपादक*

दुसऱ्या अध्यायात भगवंतानी सांख्य (ज्ञान) व (कर्मयोग) योग यांचे विवेचन केले आहे. विनोबाजी म्हणतात " दुसऱ्यात संपूर्ण जीवनाचे शास्त्र पाहिले. आता तिसऱ्यात शास्त्राचे स्पष्टीकरण. पूर्वी तत्वे पाहिली आता तपशील."

'तरी पहिला जो अध्यावो । तो शास्त्र प्रवृत्ती प्रस्तावो । द्वितीयी सांख्यसद्भावो । प्रकाशिला ॥ १४३५॥ मोक्षदानी स्वतंत्र ज्ञानप्रधाने हे शास्त्र । येतुलाले दुजी सूत्र । उभारिले ॥३६॥ मग अज्ञाने बांधलेया । मोक्षपदी बैसावया । साधनारंभु तो तृतीया । ध्यायी बोलिला ॥३७॥ ऐसेनि सद्भावे कर्म करावे । हा तिजा अध्यावो जो देवे । निर्णय केला ते जाणावे । कर्मकांड येथ ॥३९॥ अठराव्या अध्यायात ज्ञानदेव पहिल्या तीन अध्यायांची संगती अशी लावतात.

मोक्ष प्राप्त करून देणारे शास्त्राचे ज्ञान दुसऱ्या अध्यायात सांगितले खरे भगवंतांनी पण अज्ञानी जीवांना मोक्षपद प्राप्त करून घेण्याची पात्रता असणे तर जरुरी आहे ना ! म्हणून त्यासाठी भगवंतानी तिसऱ्यात कर्मउपासनेचा मार्ग सांगितला, म्हणजे मोक्षप्राप्तीच्या साधनेचा आरंभ इथून झाला. म्हणून 'साधनारंभू' तो तृतीय । ध्यायी बोलिला ॥ असे ज्ञानदेव म्हणतात.

भगवंताच्या विवेचनानं अर्जुनाच्या मनात गोंधळ निर्माण झाला. म्हणून अर्जुन जरा खडसावूनच विचारतो, 'भगवंता तू एकदा मला सांगतोस कर्म कर. मग म्हणतोस 'कर्म महत्त्वाचे नाही तर कर्मापेक्षा समबुद्धी महत्त्वाची, लाभहानी महत्त्वाची नाही. त्यामुळे माझ्या लक्षात येत नाही की कर्म करायचं की टाकायचं ! असे कर्म जर महत्त्वाचं नाही म्हणतोस तर युद्धासारखं अघोरी कर्म मला का म्हणून करायला सांगतोस ?' वेदांच्या अभ्यासातून अर्जुनाला हा प्रश्न पडलेला आहे. पूर्वी पासून (सांख्य) 'ज्ञानमार्ग' हा संन्यासाचे प्रतिपादन करणारा व 'कर्मयोग' हा यज्ञयागादिकांचा मार्ग मानला जाणारा .हे दोन्ही मार्ग तम-प्रकाशाप्रमाणे विरोधी मानले जायचे, वास्तविक सांख्यांची ज्ञाननिष्ठा व योग्यांची कर्मनिष्ठा या द्विविध (दोन नव्हेत) निष्ठा आहेत. त्यांचे अंतिम फल एकच आहे. पण सामान्यांना सांख्यांचा ज्ञानमार्ग कठीण म्हणून आचरायला सोपा असा कर्मउपासनेचा मार्ग भगवंतांनी सांगितला. या दोन भिन्न मार्गांच्या विवेचनामुळेच 'संन्यास' की 'कर्म' हा संभ्रम अर्जुनाच्या मनात निर्माण झाला. म्हणून या दोघातून योग्य असा मार्ग मला सांग असे अर्जुन म्हणतो, या दोन्ही मार्गांचा सूक्ष्म समन्वय श्रीकृष्णाने दाखवला होता पण तो नवा विचार अर्जुनाला झटकन आकलन झाला नाही. वेदात बरेच काही सांगितले तरी 'ज्ञानी' त्यातील योग्य व आवश्यक तितकेच घेतो. पृथ्वीवर जरी सगळीकडे पाणीच पाणी असले तरी आपण (जीव) आपल्याला आवश्यक तेवढे पितो तसेच आहे.

'सांख्य' आत्मदर्शनाचं तत्वज्ञान सांगणारा ज्ञानमार्ग. आत्मा हा शांत, निश्चल, अविनाशी पण निष्क्रियही. ज्ञानमार्ग 'संन्यास' प्रतिपादन करतो. खरा 'ज्ञानी', 'आत्मतृप्त' असतो. त्याने कर्मे करण्याची आवशक्ता नाही. पण त्याचे अनुकरण सामान्य लोक करतील. ज्ञान नसतांना नुसतेच निष्क्रिय बसून रहातील. म्हणन 'ज्ञानी' असणाऱ्यानेही लोकांना आदर्श म्हणून कर्मे

केलीच पाहिजेत. भगवंत म्हणतात 'मला काही मिळवायचे नाही. मी पूर्ण आहे तरी मी कर्मे करतो, कारण लोक माझे अनुकरण करतात. सर्वांनी कर्मे टाकली तर हे विश्व जे मी निर्माण केले ते ठप्प होईल. विश्वचक्र थांबावे अशी माझी इच्छा नाही.'

दुसरं असं की ऐच्छिक कर्मे टाकली म्हणजे चालणे, फिरणे सोडले तरी रक्त धमन्यातून वाहणारच ना? बघणे बोलणे टाकले तरी श्वासोच्छ्वास होणारच. म्हणजे प्रकृती गुणांची कर्मे चालूच राहणार. म्हणजे जो पर्यंत प्रकृतीचा संग आहे, देह धारण केला आहे तोवर कर्माचा त्याग घडूच शकणार नाही. आणि संन्यास घ्यायचा म्हणजे भगवीवस्त्रे घालून अरण्यात जायचं पण उदरभरणासाठी भिक्षा तर मागावीच लागणार मग तेही कर्मच आहे की. मग फक्त कुटुंबातील, समाजातील आपली जबाबदारी टाळायची व ती दुसऱ्यावर टाकायची हा कसला संन्यास? इकडे भगवी वस्त्रे धारण करून हट्टाने इंद्रिय आवरायची नि मनात जेवणाचे विचार घोळवायचे. म्हणजे इंद्रिय आवरायची नि मनानं भोगात रमायचं! म्हणजे कर्म संन्यास राहिलाच कुठे?

त्यापेक्षा उलटं असायला हवं. 'इंद्रिय विषयात रमली तरी हरकत नाही मनाने अलिप्त असावं. सूर्याचं बिंब पाण्यात पडतं तरी सूर्य कोरडाच असतो पाण्याशी त्याचा संबंध नसतो. कर्मे करावीत पण त्यात लिप्त न होता. कारण कर्म करणे तर आवश्यक आहे. नाहीतर देहधारणही होणार नाही. आपल्यात पूर्वीपासून वेडगळ कल्पना होती की परमार्थ्यांने हात पाय हलवायचे नाहीत. कामधाम करायचे नाही. कामधाम करतो तो कसला परमार्थी? मग जेवले तर कसे चालते? जनकादि लोक कर्मे करुनच मोक्षाला गेले. तुकाराम वाणी होता, सावता माळी होता, गोरा कुंभार होता, सेना न्हावी होता, नामदेव शिंपी होता. या सगळ्यांनी आपापले 'स्वधर्म' करुनच 'ज्ञान' मिळविले, मोक्ष गाठला.

भगवान श्रीकृष्णाने राजसूय यज्ञात उष्टी काढली, सारवण केलं. गाई चरायला नेल्या, घोड्याचा खरारा केला. रथाचे सारथ्य केले, लोकसंग्रहासाठी 'ज्ञानी' असणाऱ्यानेही कर्मे करणे आवश्यक आहे.

ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली तेव्हा मनुष्य प्राण्याबरोबर त्याचा 'स्वधर्म' (स्वकर्तव्य कर्म) निर्माण केला व प्रजेला सांगितलं हे करण्यात तुमचे हित आहे. याशिवाय यज्ञयाग, व्रतवैकल्ये, तीर्थाटन, मंत्रतंत्र वगैरे करण्याची तुम्हाला काही एक जरूरी नाही. पण स्वधर्माचरण न करता इंद्रियांच्या आधीन होऊन कुकर्मात दंग व्हाल तर नरकात जाल. आणि इंद्रिये स्वाधीन ठेऊन स्वधर्म कराल तर उद्धरुन जाल. सन्मार्गाने जेवढे आपण मिळवले ते भोगार्थ न समजता स्वधर्मरूप यज्ञद्वारा परमेश्वरास अर्पण करा. (यज्ञ म्हणजेच स्वधर्म पालन- ज्ञानदेव) व शेष भाग प्रसाद म्हणून सेवन करा.

पूर्वी रोज जेवायला सुरवात करायच्या अगोदर मुंज झालेल्या पुरुषांनी 'चित्रावती' अन्नाचे चार घास ताटाबाहेर उजवीकडे मांडण्याची पद्धत होती म्हणजे अन्नग्रहणाच्या अगोदर अन्नाचा देवाला नैवेद्य द्यायचा. सर्वांनी 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे । सहज हवन होते नाम घेता फुकाचे । जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म । उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म । सीताकान्त स्मरण जयजयराम । पार्वती हरहर महादेव ।' असा श्लोक म्हणून देवाचे स्मरण केले जायचे. लग्न कार्यात हा श्लोक म्हटल्याशिवाय पंगतीत जेवायला सुरुवात होत नव्हती. उदरभरण हाही यज्ञच. स्वधर्म कर्मात (यज्ञात) कर्तृत्वाची, अहंकाराची, आसक्तीची आहुती द्यायची. हा श्रेष्ठ यज्ञ.

'ज्ञानी' पूर्वी म्हणत, की कर्म केल्याने फळ भोगण्यासाठी (चांगले वाईट) पुन्हा जन्म घ्यावा लागतो व जन्ममृत्युच्या चक्रात प्राणी सापडतो. त्यापेक्षा कर्म त्याग बरा. (तरी प्रकृतीगुणांची कर्मे होणारच) आळशासारखे

असणे हेही कर्मच व त्यामुळे त्याला 'शांती' किंवा 'समाधी' मिळणार नाही. कारण या अवस्थेत 'ज्ञान' (आत्मज्ञान) आवश्यक असतं. 'नैष्कर्म्य' शब्दाचा अर्थ जरी 'कर्म नसणे' होत असला तरी नैष्कर्म्य म्हणजे निष्क्रियता नाही. तर नैष्कर्म्य म्हणजे ज्ञान, शांती किंवा समाधी. म्हणून कर्म संन्यासानं 'नैष्कर्म्य प्राप्ती' होणार नाही. म्हणून 'कर्मसंन्यास कल्पनाच चुकीची, खुळेपणाची.

'कर्तृत्वाचा अहंकार' व 'फळाची आसक्ती' याला ज्ञानदेव कर्मबंधन म्हणतात. व या कर्मातून 'पुनरपि जननं पुनरपि मरणम्'. हे चक्र चालू राहते. या चक्रालाच वेदान्ती 'कर्म बंधन' म्हणतात. पण भगवंत याला उपाय सांगतात. 'बी' भाजून पेरले तर ते रूजत नाही. तदवत अहंकार व फळाचा त्याग केला असता कर्म रुजत नाही. कर्मबंधन प्राप्त होत नाही. अशाप्रकारे तू युद्धकर्म केलेस तर तुला मोक्ष प्राप्तीच होईल. म्हणून तू युद्ध कर. प्रत्येकाने आपले स्वधर्म कर्म करणे हे त्याचे कर्तव्यच आहे. आईवडिलांची सेवा हे जन्माला आल्याबरोबर माझं कर्तव्य ठरतं. तसंच ज्या समाजात, ज्या देशात मी जन्मलो त्या समाजाची, देशाची, सेवा करणे माझे कर्तव्य ठरते. यज्ञार्थ कर्मे कधीच बंधन कारक नसतात. तीन नियम लक्षात ठेवा. (१) कर्म करायचेच (२) अहंकार व (३) आसक्ती सोडून. 'कर्म कर' 'फळ टाक' हे गीतेचं तत्त्व.

'मी अमुक काम केलं' यात कामाचं महत्त्व नसून 'मी केलं' याचं महत्त्व असतं. 'मी' चा जप त्या व्यक्तीबद्दल तिरस्कार करतो. चांगलं काम केलं तर लोक कर्त्याची चौकशी करतात कामाचं कौतुक करतात. निरपेक्ष, निःस्वार्थ बुद्धीने ठाण्याचा कायापालट करणारे ठाण्याचे माजी आयुक्त टी. चंद्रशेखर ठाणेकरांच्या गळ्यातले ताईत बनलेच ना ? कीर्ती, पैशाच्या मागे लागाल तर तो दूर पळतो, पण 'न मागे तयाची रमा होय दासी ।' लक्ष्मीचं स्वयंवर होतं. अनेक इच्छुक आशाळभूतासारखे ललचावून उभे होते. पण लक्ष्मीने तेथे हजरही नसलेल्या विष्णुच्या गळ्यात जाऊन माळ घातली व त्याचे पाय चुरत बसली. 'मी' च मोठेपणा 'मी' ला विसरण्यात आहे. 'अहंकाराची आहुती' हा सर्वात मोठा यज्ञ. असे विवेकानंद म्हणत. म्हणून निरहंकार कर्मे करणे म्हणजे 'यज्ञार्थ कर्मे' ती बंधनकारक होत नाही.

या बाबतीत ज्ञानेश्वर म्हणतात, 'आपण तर आत्मा आहोत मग प्रकृतीनं केलेली कर्मे मी केली असा अभिमान बाळगणे हे तर बंधनकारक होणारच. निसर्गातील सर्व कामे सूर्य ऊर्जेवर चालतात. त्याचा अहंकार सूर्याला कुठे आहे ? मी जेवतो पण पचन प्रकृती करते. आपण 'बी' पेरतो, पाणी घालतो पण त्याचा वृक्ष होणे हे प्रकृतीचे कार्य. प्रकृती गुणांनी ही कर्मे होतात. त्याबद्दल 'मी केलं' हा अहंकार मी का बरं धरायचा ? त्रिगुणांना विकसित करतात गतिमान करून हा निसर्ग नियम आहे. जर 'मी केलं' याला अर्थ नाही. तर 'मी भोगेन' (फळाची आसक्ती) यालाही काय अर्थ ?

स्वधर्म पालन केल्यानं देव संतुष्ट होतात व ते आपल्याला इष्ट भोग देतात. म्हणजे आपल्या गरजा भागवतात. जर देवांना संतुष्ट न करता तुम्ही परभारे आपले भोग घेतले तर ते पाप होईल. असं भगवंत सांगतात.

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः । यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः । या १४व्या श्लोकात भगवंत म्हणतात अन्नापासून (याचा वैदिक अर्थ पृथ्वी) प्राणी उत्पन्न होतात. पर्जन्याचा अर्थ पाऊस नाही. (वैदिक अर्थ विद्युत लहरी) इथे एक विश्वप्रक्रिया भगवद्गीतेने मांडली आहे. यज्ञ - विकसन प्रक्रिया हा अर्थ, अन्न-भूते-पर्जन्य-यज्ञ-कर्म-ब्रह्मा-अक्षर-ब्रह्म... हीच प्रक्रिया उलट केली तर विश्वनिर्मिती प्रक्रिया ध्यानात येईल..

ब्रह्म-अक्षर-ब्रह्मा-कर्म-यज्ञ-पर्जन्य-भूते-अन्न (जीवन) जडद्रव्य विरहित केवळ ज्ञानमय चैतन्य हे देवाचं

स्वरूप. जीवन म्हणजे निव्वळ उपभोग ही कल्पना विकसन थांबवील व जीवनाला मर्यादित करील. म्हणून जीवनाचं ध्येय यज्ञ करणं, यज्ञावाचून भोग घेणं म्हणजे चोरीच. आपल्या ठिकाणी असलेलं आत्मतत्त्व हाच देव. ते आत्मतत्त्व चैतन्यमय, ज्ञानमय, विद्युन्मय आहे. यज्ञाने लोकसंग्रह होतो म्हणून स्वधर्मरूप कर्माचा यज्ञ करणं आवश्यक. कारण सामान्य लोक श्रेष्ठांचं अनुकरण करतात. दोन पोपटांची गोष्ट आहे एकाला वेदान्ताच्या घरी ठेवलं. दुसऱ्याला चांभाराच्या. तर वेदान्ताच्या घरचा पोपट ' या बसा म्हणून स्वागत करू लागला, श्लोक म्हणू लागला. चांभाराकडचा शिव्या द्यायला शिकला. म्हणजे माणसेच काय प्राणी पण अनुकरण करतात. म्हणून श्रेष्ठींनी अखंड कार्यरत असायला हवं. साक्षीभावानं, अलिप्ततेन कर्मे करावीत. आपण नाटक सिनेमा पाहतो. त्यावेळी त्या 'पात्रांच्या' सुखदुःखाशी आपण साक्षीभावानं एकरूप होतो. अलिप्त राहून नाटकातील सुखदुःख उपभोगतो. अगदी त्याच भावनेने कर्मे करावीत. यज्ञाने इंद्रियाधीन न होता कर्मे करावीत. ही सुखदुःखे देहाची आहेत ती माझी नाहीत. मी 'आत्मा' आहे.

कर्मात भावनेचा ओलावा हवा म्हणजेच भक्ती हवी. भक्ती भावना ही आत्म्यापासून निघते. आपण दुकानात जाऊन वस्तू घेतो व त्याचा मोबदला म्हणून पैसे देतो. ते पैसे भिजवून देत नाही कारण तेथे भावनेचा प्रश्नच येत नाही, वस्तू घे पैसे दे, पण दक्षिणा ही भिजवून द्यावी लागते. ती किती दिली याला महत्त्व नाही. त्यामागच्या भावनेला महत्त्व आहे म्हणून दक्षिणा भिजवून देतात. भगवंतलाही भक्ताचा भाव हवा असतो. म्हणून तर सुदाम्याचे मूठभर पोहे, द्रौपदीचे एक पान खाऊन भगवंत तृप्त होतो. भक्तीभावाने वाहिलेले 'फूल' किंवा 'तुळशीपत्राला' ब्रह्मांडाचे वजन प्राप्त होते. विनोबाजी उदाहरण देतात, दोन माणसे गंगेत स्नानाला जातात. त्यातला एक म्हणतो दोन भाग हैड्रोजन एक भाग ऑक्सिजन मिळाले की झाली गंगा. दुसरा तिला स्वर्गातून शंकराच्या जटेतून विष्णुच्या पदकमलातून अवतरलेली अशी पवित्र नदी गंगा अशा भावनेने तिच्यात स्नान करतो. पहिल्याची पाण्याने देहशुद्धी होते पण दुसऱ्याची देहशुद्धी व चित्त शुद्धीही होते. कर्म तेच पण एकाला फक्त देहशुद्धीचे फळ मिळते , दुसऱ्याला देह व चित्तशुद्धी दोन्हींचे फळ मिळते. देहशुद्धी तर गाय, म्हशी, बैल पण पाण्यात डुंबून करतात.

ज्ञानयोग (सांख्य) व कर्मयोग यांचा समन्वय भगवंताने घातला कारण त्याला सांख्यांचं 'ज्ञान' हवं होतं पण त्यांची 'निष्क्रियता' नको होती. कर्मयोग्यांची 'क्रियाशीलता' हवी होती. पण भोगासक्ती नको होती. कर्म व ज्ञान हे दोन पंख आहेत त्या दोन्ही पंखानी उडायचं आहे. नुसत्या एकाने उडता येणार नाही. कारण 'कर्माविना ज्ञान पांगळं असतं विज्ञानाविना कर्म आंधळं असतं' असं लो. टिळकांनीच गीतारहस्यात सांगितलंय.

इंद्रिये स्वाधीन ठेऊन कर्माचरण करावं. स्वैर इंद्रियाचरण क्षणभर गोड लागेल पण ते नित्य दुःख देणारे ठरेल. त्या उलट इंद्रियाधीन न होता केलेले कर्माचरण सुरुवातीला कष्टप्रद वाटेल पण नंतर ते नित्य सुखदायी ठरेल. चार वर्णांची चार आश्रमांची कर्मे निरनिराळी आहेत. प्रत्येकाने स्वधर्म कर्मे करावी. ती कितीही कष्टदायक असली तरी दुसऱ्याचे सोपे कर्म आहे म्हणून अंगिकारू नये. ते घातक ठरते. स्वधर्म आचरावा, परधर्मा विषयी आदर राखावा.

भगवंत सांगतात 'कर्मयोगात फलत्याग महत्त्वाचा. फलत्यागी अनंतफळ मिळतो. आपण सामान्य लोक फळाला कुंपण घालतो. अपार कर्म करून अल्प फळ मिळवतो. याचे कारण सामान्य संसारी क्षुद्र फलाशेने मोठी तपस्या करतो. कर्म योगी फलत्यागी असल्यामुळे अनंतपट फळ मिळवतो. देव द्यायला तयार असतो पण आपणच कल्पतरुखाली करवंटी मागतो. 'अनंत हस्ते कमलावराने घेता कीती घेशील दो कराने ?' इतके तो द्यायला उभा

आहे की देणाऱ्याचे हात हजारो । दुबळी माझी झोळी' अशी आपली पामराची क्षुद्रता आहे.

अज्ञानी लोक कर्मासक्त असतात, त्यांचा बुद्धीभेद ज्ञानी लोकांनी करू नये. कारण फलाशे विना कर्मे करणे त्यांना एकदम शक्य होणार नाही. पण हळूहळू अनुकरणाने ते शिकतील. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे केव्हाही श्रेष्ठच. कर्मयोगी लोकांना आदर्श म्हणून कर्मे करतो. तुकाराम, एकनाथ महाराज कर्मयोगीच होते. 'पिबन्ति नद्या स्वयमेव नाथा । स्वयं न खादंति फलानि वृक्षा । नादन्ति सस्यं खलु वरिवाहः । परोपकाराय सताम् विभुतया ।' कर्मयोगी कर्मातच आनंद मानणारा स्वयंतृप्त असतो तो कर्मे करतो ती इतरांना आदर्श म्हणून.

सुखाने आचरिता येणाऱ्या परधर्मापेक्षा गुणाने कमी असा स्वधर्मच श्रेयस्कर होय. स्वधर्मामध्ये मरण आलेले कल्याणकारक असते. परंतु परधर्माचरण हे घातक असते. यावर अर्जुन विचारतो, एवढे माहीत असून, इच्छा नसतांनाही माणूस पापचरण का करतो ?

भगवंत म्हणतात, ' काम क्रोध हे ज्ञानाचे शत्रू आहेत. ते भल्या भल्यानाही योगभ्रष्ट करतात. विश्वामित्र व पराशराचे याबाबतचे उदाहरण सर्वांना ज्ञात आहे. धुळीने आरसा, वारेने गर्भ, धुराने अग्नि जसा व्याप्त असतो तसेच काम क्रोधाने ज्ञान गुरफटून टाकलेले असते. इंद्रिये, मन बुद्धीही त्याची वसती स्थाने. म्हणून तू इंद्रियांचे संयमन करून ज्ञान विज्ञानाचा नाश करणाऱ्या या द्वयीला नाहीसे कर. कारण वारा जसा नाव पाण्यात खेचतो तसेच काम क्रोध आपल्या कडे ज्ञानाला खेचतात.

ज्ञान-आत्मज्ञान, विज्ञान-विश्वज्ञान हे काम क्रोधामुळे होत नाही. त्यामुळे धड जीवनही जगता येत नाही. देह-देहापेक्षा इंद्रिये श्रेष्ठ, इंद्रियापेक्षा मन, मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ, व बुद्धीपेक्षा आत्मा श्रेष्ठ ! या आत्मतत्त्वावर स्थिर झाले की काम क्रोध सुटतात. अशा रीतीने आत्मतत्त्वे स्थिर होऊन कामक्रोध जिंकले की स्थितप्रज्ञता येईल. मन शांत निश्चल होईल. समाधी अवस्था प्राप्त होईल. मग त्या अवस्थेत कर्मशील व्हावे.

दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी इंद्रियेस्वाधीन ठेवणाऱ्या स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली व या अध्यायाच्या शेवटीही स्वधर्माची योग्य निवड करण्यासाठी स्थितप्रज्ञताच सांगितली. जीवनात यश किंवा सुख मिळवायचे असेल तर ते मन बुद्धीच्या एकात्मतेवर अवलंबून आहे, कारण जसे मन तसा माणूस. मन बुद्धीच्या आधीन असावे पण बुद्धी मनाच्या स्वाधीन असू नये.

या अध्यायाच्या शेवटी फिरून स्थितप्रज्ञाच्याच भूमिकेवर भगवंताने आणून सोडले आहे.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्
'आराधना' टॉकिज जवळ
ठाणे (प), ४०० ६०२ फोन: ५४१०१४०

• • •

दिशा
नियमित वाचा.

# श्रीमत् आद्य शंकराचार्य यांचा मायावाद व आधुनिक विज्ञान

*आधुनिक विज्ञान विशेषत: पदार्थ विज्ञान, आणि आद्य शंकराचार्यच्या मायावादाचे तत्त्वज्ञान यातील साम्य सांगणारा हा लेख आहे. - संपादक*

**ज्ञानाच्या दोन शाखा :**

ज्ञान प्राप्तीचे दोन प्रमुख मार्ग आहेत. या शाखा आहेत. एक शाखा अंत:प्रज्ञेतून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची व दुसरी शाखा बाह्य जगताच्या विश्लेषणाद्वारे होणाऱ्या ज्ञानाची. म्हणजेच एक प्रयोगाने सिद्ध करून स्वीकारण्यात येणारे ज्ञान व दुसरे अंतर्मनाचा धांडोळा घेत असताना प्राप्त होणारे ज्ञान. थोडक्यात भौतिक ज्ञान व आध्यात्मिक ज्ञान. या दोनही ज्ञानशाखा अंतिम सत्याचा धांडोळा घेण्यासाठी प्रवृत्त झाल्याने या दोन्ही ज्ञानांच्या द्वारे अनुभवास येणारी अंतिम गोष्ट एकाच स्वरूपाची असल्याचे आढळते. वेदान्ती वा वैज्ञानिक एकाच निष्कर्षाप्रत येतात. याच भूमिकेतून आचार्यांनी मांडलेला मायावाद व आधुनिक विज्ञानातील सापेक्षतावाद या दोन्ही गोष्टी एकाच स्वरूपाच्या असून अंतिम सत्य ध्यानात आणून देण्यासाठी कशा उपयुक्त ठरतात, हेच आपल्याला समजावून घ्यावयाचे आहे. तरच विज्ञान व वेदान्त या उभय ज्ञान शाखा कशा परस्पर पूरक आहेत याचा बोध होईल. असे घडल्यास कोणत्या तरी एकाच ज्ञान शाखेला महत्त्व देण्याचा पक्षपातीपणा आपल्या हातून घडणार नाही.

**मायावादाचे स्वरूप :**

हा विषय समजण्यासाठी मायावादाचे थोडक्यात स्वरूप समजावून घेतल्यास वरील विधानाची सत्यता पडताळून पाहणे सोपे होईल. विश्वाचा उलगडा करताना अत्यंत परिश्रम पूर्वक ऋषींनी लावलेला तो शोध आहे. वस्तु जशी इंद्रियांना स्थळकाळ मर्यादित भासते तशी नसते. बाह्य व आंतर सर्व अनुभव एकत्र केले असता वस्तू कशा दिसतात हेच कळते. कशा आहेत व का आहेत हे कळत नाही. पाश्चात्य तत्त्ववेत्ते पर्मिडोनस, प्लेटो आदी म्हणतात. दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे सत्याच्या छाया होत अगर केवळ भास होत. उपनिषदाने विश्व म्हणजे माया असे सांगितले आहे आणि व्यावहारिक ज्ञान सत्य नसून ते अज्ञानच होय. आत्मा हा स्वतंत्र आहे तो स्थळकाळ मर्यादातीत आहे. तो अणूहून अणू आहे. तो परिपूर्ण आहे. अविभाज्य आहे. वैश्विक आत्मा व जीवात्मा एकच होत. आपल्या मनातील द्वैत ज्या प्रमाणात नाहीसे होईल त्या प्रमाणात ब्रह्म दर्शन घडेल.

सत्याला आवरण दोन प्रकारचे असते - सापेक्ष व अंतिम. सापेक्ष दृष्टीत विश्वाचे अस्तित्व मान्यच केले जाते मात्र अंतिम सत्याच्या दृष्टीने तीत सत्यत्व नाही. ब्रह्म ज्ञानाने द्वंद्व दृष्टी नष्ट होते. वेदान्ताची शिकवण फक्त अंतिम सत्य निदर्शित करणे हीच आहे. 'सर्वं खलु इदं ब्रह्म'। म्हणूनच वेदान्ती (अद्वैती) उत्पत्ती इत्यादी हा आभास आहे असे मानतात. ब्रह्मावर आरोपित केलेले हे विश्व आहे यालाच आचार्य अध्यास असे म्हणतात. अमर्यादाच मर्यादित होते, अनन्तच सान्त होतो यालाच माया म्हणतात. या मीयते सा। जी मोजता येते ती माया अथवा 'या मा' - जी नाही, ती आहे असे म्हणणे ती माया. मायेमुळेच विविधता ही सत्य वाटते. ती सापेक्ष आहे. परंतु अंतिम सत्याच्या दृष्टीने ती नगण्य ठरते. माया ब्रह्माला झाकाळून टाकते. या मायेलाच अज्ञान असे म्हणतात.

**सापेक्षतावाद :**

ख्रिस्त सन १९०५ साली आईनस्टाईन यांनी सापेक्षतेचा सिद्धांत मांडला आणि वैज्ञानिक जगतात फार मोठी क्रांती झाली. आज पर्यंत उराशी बाळगलेल्या जड व चेतन या द्वैत कल्पनेचा पायाच उखडला गेला. कारण ही दोन्ही तत्वे एकच आहेत. अद्वैत सिद्धान्तच सत्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली. या शिवाय अनेक दुर्बोध गोष्टींचाही उलगडा होण्यास या सिद्धांताने मदत झाली. पदार्थ शास्त्र, खगोल शास्त्र, मानस शास्त्र, आध्यात्मिक शास्त्र आदी शास्त्रातील दुर्बोध कल्पनांचा उलगडा होण्यास मदत झाली. किंबहुना सापेक्ष सिद्धांतामुळे आध्यात्म शास्त्रातील एका वादग्रस्त मुद्यासंबंधी स्पष्टीकरण करता येणे सुलभ झाले. हा अध्यात्म शास्त्राचा फार मोठा लाभच मानावा लागेल. श्री शंकराचार्यांनी ब्रह्माचे एकमेव अद्वितीयत्व सिद्ध करण्यासाठी माया वादाचा सिद्धांत उपस्थापित केला. ''ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या, जीवो ब्रह्मैव न अपर: । या श्लोकार्धात मायावादाचे पूर्ण स्पष्टीकरण केले आहे व ब्रह्माचे अद्वितीयत्व प्रस्थापित केले आहे. यावर अनेक लोकांनी आक्षेप घेतले आहेत व अद्याप घेतले जात आहेत. मायावादाची कल्पना दुर्ज्ञेय असल्याने अनेकांना त्याला उलगडा झालेला नाही. सापेक्ष सिद्धांताने वैज्ञानिक स्तरावर याचा बोध करून घेणे शक्य झाले आहे.

**विज्ञानाचा दृष्टीकोण :**

विज्ञानाचा दृष्टीकोण निसर्ग समजावून घेणे हा नसून निसर्गाबद्दलचे निरिक्षण व त्याद्वारे निष्कर्ष काढणे हा आहे. वास्तविक विश्वासंबंधीचा विचार हा आपल्या स्वत: संबंधीचाच विचार असतो. आम्ही जे पाहतो अनुभवतो हेच निरपेक्षतेने घडल्यास वैश्विक पूर्णतेचा अनुभव येऊ शकेल. परंतु आपले पाहाणे, अनुभवणे हे सारे सापेक्ष घडत असल्याने पूर्णतेचा अनुभव येऊ शकत नाही. स्थळ व काळ हे वेगळे असतात असे निसर्गाला जाणवत नसते. त्या दोहोत अभिन्नता असते. भिन्नतेची जाण फक्त जाणिवेतूनच निर्माण होते. मानवाचे डोळेच त्याचे विभाजन करतात. आणि त्या विभागाला आपण स्थळ, काळ अशी वेगवेगळी संज्ञा देतो. म्हणजे आपल्या चक्षूमुळे त्याचे विभाजन होते. सापेक्ष सिद्धांताप्रमाणे स्थळ काळाची निर्मिती ही सापेक्ष मानली जाते.

**सापेक्षतेचे नियम सार्वत्रिक :**

चेतन अचेतन, गती, स्थिती, शरीर, आत्मा या साऱ्या गोष्टींत एकच निसर्गाचा नियम असलेला आढळतो. असे सापेक्ष सिद्धांताने कळले. या सिद्धांतामुळे पृथक अगर अलगता या पेक्षा परस्पराना जोडणारा दुवा असतो हे ध्यानात आणून दिले जाते. यामुळे वस्तुस्थिती निदर्शक बोध होण्यास मदत होते. दोन वस्तूत परस्पर होणारे संक्रमण हे कृत्रिम पद्धतीने घडत असते. उदाहरणार्थ एखादा सामान्य माणूस ज्यावेळी योगी वा ज्ञानी होतो तेव्हा त्याच्यात खूप मोठा बदल झालेला आढळतो. गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रातही होणारा बदल अशाच स्वरुपाचा असतो. पदार्थाचे वजन घटणे वा वाढणे हे संभवते. याचाच अर्थ माणूस ईश्वराबद्दल, आत्म्याबद्दल विचार करु लागताच तो एका नव्या शक्तीच्या प्रांतांत प्रवेश करतो, म्हणजे त्याचे पूर्व जीवन व प्रवेश झाल्यानंतरचे जीवन यात बदल घडलेला पहावयास मिळतो, असाच बदल भूस्तरावर कर्षण शक्तीने होत असतो.

सूर्याचा प्रकाश-किरणांचा मार्ग ज्या भौगोलिक अवकाशातून किरण जातात, त्यावर अवलंबून असतो. असा सापेक्षतेच्या सिद्धांताचा एक भाग आहे. आपण अवकाशात नक्षत्रे पाहतो ती त्याच स्थळी पाहताना असतात असे मात्र म्हणता येणार नाही. त्यांची प्रकाश किरणे सूर्या जवळून जात असताना सूर्याच्या कर्षण शक्तीने ती वक्र होतात. त्याच प्रमाणे आत्मप्रकाशही उपाधीच्या संदर्भात वक्र होतो.

**संपूर्ण विश्व तरंगमय आहे :**

सांप्रत पदार्थ विज्ञानाचा कल संपूर्ण विश्व तरंगमय आहे असे मानण्याकडे आहे. आणि तरंग दोन प्रकारे आढळतात. एक बद्ध तरंग त्यालाच पदार्थ अथवा जीव म्हणतात. दुसरे मुक्त तरंग यालाच परावर्तन, प्रकाश वा भगवान असे म्हणतात. पदार्थाच्या विनाश म्हणजे बंदिस्त तरंगाची अवस्था नष्ट करावयाची. म्हणजे बद्ध तरंग मुक्त करावयाचे आणि त्याना अवकाशात मुक्त संचार करू द्यावयाचा. ही संकल्पना संपूर्ण विश्वच परावर्तित असल्याचे सिद्ध करते. यावरून प्रत्येक वस्तूच्या (पदार्थ वा जीव) अंतर्यामी ब्रह्माचे गुणधर्म आहेत हेच सिद्ध होते.

एखादा इलेक्ट्रॉन अवकाशात अमक्या स्थळी आहे असे जाणता आले तरी त्याची गतिमानता किती आहे याचा बोध होत नाही. त्याच प्रमाणे शरीरात बद्ध झालेला जीव सर्वत्रव्यापक असू शकतो. याचा त्या जीवालाच बोध होत नाही. एखाद्या इलेक्ट्रॉनची गती निश्चितपणे जाणता आली तरी तो इलेक्ट्रॉन अवकाशात नेमका कुठे आहे हे ध्यानात येत नाही. म्हणूनच ईश्वराचे नेमके स्थान, त्याची गति व त्याने सर्वास्तित्व या गोष्टी ध्यानात येत नाहीत. पदार्थ वा त्याची परावर्तित स्थिती ही उभयता तरंगाकार असल्याने आणि सर्वास्तित्व असलेला परमेश्वर हा नित्य असल्याने त्याच्या निश्चितस्थानापेक्षाही त्याच्या अस्तित्वाचा बोध महत्त्वाचा ठरतो. जीव हा अंतिम सत्यात शोधूनही सापडणार नाही कारण जीव म्हणजे वेगळ्या आविष्कारात ध्यानात येणारे अंतिम सत्यच आहे. जीवो ब्रह्मैव न अपरः । जीव हा ब्रह्मच आहे. त्याला वेगळे अस्तित्व संभवत नाही.

**अंतिम सत्य चांगले वा वाईट दोनही नाही :**

चांगले वा वाईट ही पदार्थाशी संबंधित असणारी वस्तुस्थिती आहे. अशी आपली समजूत आहे. अंतिम सत्य चांगले अगर वाईट याच्या पलीकडे आहे. कारण सापेक्षताच सर्वत्र असलेली आढळते. जे एखाद्याला चांगले असे वाटते तेच दुसऱ्याला वाईट असे वाटते. कोणतीही गोष्ट चांगली अगर वाईट असूच शकत नाही. ब्रह्मचारी याच्या दृष्टीने जे चांगले कर्तव्य म्हणून पालन केले जावे असे सांगितले जाते तीच गोष्ट गृहस्थाच्या दृष्टीने अयोग्य ठरते. संन्याश्याच्या दृष्टीने अहिंसाव्रत हे योग्य आहे. परंतु गृहस्थाला तसे चालणार नाही. स्व-संरक्षणार्थ का होईना हिंसेचा अवलंब त्याला करावाच लागतो. सापेक्षता सिद्धांत असे सांगतो की विश्व काही यंत्र नाही की एकाच पद्धतीचा व्यवहार व्हावा. इथे ठोकळेबाजपणा चालत नाही. स्थळ, काळ, कार्य-कारणभाव, गती, अवधी, वजन, शक्ती इत्यादी सारे सापेक्ष आहेत. त्यांचे मूल्य ज्ञात्याच्या निरीक्षणानुसार बदलत असते. यालाच अंतिम वा विशुद्ध जाण म्हणतात. हीच जाण विषय आणि विषयी यांच्या पलीकडे नेते. म्हणजेच ज्ञाता व ज्ञेय यांचा लोप होतो.

**अवकाश, काळ व क र्यकारणभाव :**

अवकाश, काळ, गती, कार्यकारणभाव इत्यादी साऱ्या गोष्टी आपणाला सत्य वाटतात. मात्र त्या साऱ्याना खरे अस्तित्व नसून त्या सापेक्ष आहेत. हेच सापेक्षता सिद्धांताने मांडण्यात आलेले आहे. ज्ञानेंद्रियाकडून होणाऱ्या ज्ञानाने सत्याचे खरे दर्शन होत नाही. कारण ज्ञानेंद्रियांची शक्ती मर्यादित असते. शिवाय बाह्यजगाकडे पाहण्याचा जसा दृष्टिकोन असतो त्या प्रमाणे दृश्ये वेगळी असू शकतात. अनुभव आणि सत्य या दोहोत खूप तफावत आढळते. सापेक्षता सिद्धान्ताप्रमाणे सगळा काळ हा मानसिक आहे आणि त्याची गती कोणत्याही पद्धतीने मोजता येणे कठीण आहे. कार्यकारण भाव देखील सापेक्ष आहे कारण त्याचे अस्तित्व जागृतावस्थेतच असते. स्वप्न वा सुषुप्ती इथे या भावाचा लोप होतो. यालाच शंकराचार्य व्यावहारिक सत्य असे म्हणतात. परमार्थिक दृष्ट्या म्हणजे ज्ञानाच्या अंतिम अवस्थेत या व्यावहारिक सत्याला काही

अस्तित्व राहात नाही. याचा विचार केल्यास आचार्यांचे प्रतिपादन किती तर्काधिष्ठित आहे व आजच्या भाषेत विज्ञान निष्ठ आहे हे ध्यानात येईल.

अवकाश आणि काळ या दोन्ही गोष्टी माया स्वरूपाच्या आहेत. या बद्दल तत्वज्ञ व वैज्ञानिक यांचे एकमत आहे. या गोष्टी मनःकल्पित आहेत. त्या सत्य दर्शक नाहीत. पाहणारा आपल्या बुद्धीने स्थळ काळ मर्यादित वस्तूंची शृंखला निर्माण करतो आणि त्याला अनुसरून त्यांचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करतो. एकच वस्तू अनेक रूपाने भासते कारण ती वेगवेगळ्या स्तरावरून पाहिली जात असल्याने प्रत्येकाला तसा अनुभव येतो. ही धरणा देखील स्वप्न सदृश्यच मानावी लागेल. जागृत अवस्थेत स्वप्न विरते त्या प्रमाणे आत्मज्ञान झाल्यावर जागृतीतील दृश्यांचे होते. तेही विरून जाते. पदार्थ संबंधी करण्यात येणारे मोजमाप, लांबी, रुंदी, त्याची घनता, गती, शक्ती आदि खरी मानली गेली तर ती सापेक्षच आहेत. ती काही त्या मूळ पदार्थांचे गुण धर्म नव्हेत. पदार्थ व पदार्थ पाहणारा यातील संबंध या गोष्टी व्यक्तवीत असतात.

**सर्व विश्व तरंगाकृती :**

एखादा इलेक्ट्रान दोन प्रकारचे रूप धारण करु शकतो. त्याचे कारण तो तसा असतो म्हणून नसून आपला त्याच्या कडे पाहण्याचा दृष्टिकोन तसा असतो. ज्याला आपण पदार्थ म्हणतो तो केवळ दृश्य स्वरूपाचा असतो. हा दृष्टिभ्रम आहे. कारण खऱ्या वस्तू खेरीज अन्य काही संभवतच नाही. क्वांटम् सिद्धांताने हे स्पष्ट केले आहे. जे काही पदार्थकण म्हणून दिसतात ते तरंगच असतात. तरंगाला काही कारणाने अडथळा निर्माण होऊन तोच तरंगदृश्य स्वरूपात व्यक्त होतो. हे दिसणे केवळ स्वीकृती करण्या इतकेच राहते. तत्वज्ञानाच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास ब्रह्म उपाधीमुळे जीव स्वरूपात व्यक्त होते. अवकाश-अमर्याद, अनंत-हा आत्म्याचा गुणधर्म आहे. आत्मा सर्वत्र आहे. अज्ञानामुळे तो एका विशिष्ट गोष्टी पुरता अव्यापक होतो. या म्हणण्यातच असत्य दडलेले आहे. आपल्याला हे असत्य घालवावे लागेल. अव्यापकता ही कल्पना झुगारून द्यावी लागेल, तरंग प्रकाश गतीने चालतात तेव्हाच त्यांना परावर्तन ही संज्ञा प्राप्त होते. जे तरंग बऱ्याचशा मंद गतीने चालतात वा चालत नाहीत त्याना पदार्थ म्हणतो. वास्तविकतः हे पदार्थ वा ही परावर्तिते मूलतः एकाच तरंग सामान्याची असतात. गतीच्या कमी जास्तपणामुळे हा फरक जाणवतो. विश्व तरंगाकारच असून दोन प्रकारे भासते हे सिद्ध होते.

**काळ :**

अवकाश व काळ ही विश्वाचे नैसर्गिक स्वरूपे नसून आपल्या इंद्रियांच्या माध्यमातून होणाऱ्या ज्ञानाचे हे स्वरूप आहे. घटना व ती पाहणारा असल्या शिवाय काळाचे अस्तित्व ध्यानात येत नाही. काळ खरोखरच अस्तित्वात नसतो. काळाला स्वतंत्र अस्तित्व नाही. वर्तमानाखेरीज घटनाच असत नाही. पाहणारा नेहमीच वर्तमान काळीच विद्यमान असतो. अवकाश व काळ व ती पाहणारा असल्याखेरीज काय घडते याची नोंद घेता येत नाही. अवकाश व काळ घटनेमुळेच भासमान होतात. बाह्य विश्वातील घटनेवरून काळाचे भूत, भविष्य व वर्तमान असे काल्पनिक विभाग वर्तविले जातात. काळाला घटनात्मक रूप मानून ती सत्य म्हणून आपण स्वीकारत असतो. अवकाशाप्रमाणे काळही अमूर्त आहे. अमूर्त ज्या वेळी वस्तुस्थिती म्हणून स्वीकारले जाते तेव्हा खरा गोंधळ निर्माण होतो. निर्मितीच नाही तेथे काळ कसा संभवेल? भासमानतेला पचनी पाडू तरच आपणाला सत्यत्वाचा बोध होणे शक्य होईल.

एखाद्या घटनेचा विचार करताना आपल्या मानसिक स्तरावर विशिष्ट वेळ विशिष्ट स्थान निदर्शित होते. परंतु हे खरे नसते. सापेक्षता सिद्धांताप्रमाणे सगळा काळ

हा मानसिक आहे. आपण पदार्थ दर्शनाला अवकाश म्हणतो आणि घटनांच्या आलेखाला काळ म्हणतो. घटनांचे दर्शन घडविण्यास काळ एक माध्यम ठरतो. प्रेमात पडलेल्या व्यक्तीला प्रेयसीच्या संगतीत काळ हा क्षणिक वाटतो आणि दुःखी मनःस्थितीत असलेल्या व्यक्तीला तोच काळ अनंत वाटतो. म्हणून काळाला खरे अस्तित्व नसते. सृष्टी सृष्टीच्या सुरुवातीला काय होते आणि सृष्टी विनाशानंतर काय राहणार असे विचारणे ही एक निरर्थक बडबड आहे. आत्मा सृष्टीपूर्वी व सृष्टी नंतरही आहे. भूतकाळ हा एक फक्त विचार आहे आणि भविष्य काळ हा एक काल्पनिक विचार आहे.

**गती :**

आईन स्टाईन यांनी मांडलेल्या सिद्धांताप्रमाणे गती म्हणजे दोन गोष्टींतील अंतर कमी करण्यासाठी होणारा प्रयत्न. हा जास्त कमी होऊ शकतो. म्हणून गती देखील सापेक्षच. समुद्रात एखादे जहाज नांगरलेले आहे म्हणून ते स्थिर आहे असे आपण म्हणतो, ही गोष्ट सापेक्षच कारण पृथ्वी सतत गतिमान आहे. तिची गतिमानता सूर्याच्या संदर्भात असते म्हणून पृथ्वीची गतीही सापेक्षच. सूर्य आणि पृथ्वी ही उभयता तारकापुंजात फिरत असतात. त्यामुळे चल व स्थिर ठरविणे कठीण आहे.

**कार्य-कारण भाव :**

कार्य निर्माण होणाऱ्या पूर्वभागाला कारण म्हणतात. अशा प्रकारे कार्यकारण मालिका तयार होते. परंतु ही मालिका जागृतावस्थेतच असते. त्यानंतर त्याचा नाश होतो. म्हणजे कार्यकारणभाव हा नित्य सापेक्ष आहे. क्वांटम् सिद्धांत प्रस्थापित करणारे हायजेन वर्ग म्हणतात. कारण हे सापेक्ष आहे. जे पहिले घडते त्याला कारण म्हणतात आणि मागाहून घडते त्याला कार्य म्हणतात. ईश्वर सर्वत्र आहे हे जेव्हा कळते तेव्हा कार्य व कारण दोनही नाहीशी होतात. ही सारी सृष्टी अभिव्यक्त झालेली दिसते. ती अविद्या मूलक व माया मूलक होय.

**मूळ शक्तीचे अधिष्ठान ध्यानात येत नाही :**

सामान्य माणूस ज्याला जग म्हणतो ते इंद्रिय ज्ञानाने होय. पाच इंद्रिया मार्फत त्याला जो बोध होतो त्याचा हा परिणाम असतो. पृथ्वी सपाट दिसते वस्तुतः ती गोल आहे. ती स्थिर आहेसे वाटते परंतु ती नित्य गतिमान आहे. याची जाण इंद्रियाना नसते. म्हणजे पाहणाऱ्याकडून चूकही संभवते. अनुभव आणि सत्य यात महदंतर असते. सत्याचे दर्शन पूर्णतेच्या दर्शनात आहे. पूर्ण आहे तेच सत्य आहे ही पक्की धारणा झाली पाहिजे. म्हणजेच एक जाणले असता सारे जाणल्या सारखे होईल हे उपनिषद् वाक्य ध्यानात येईल. '' एकं विज्ञाते सर्वं विज्ञातं भवति।

**मनच बाह्य जगाला जन्मास घालते.**

आपण बाह्य वस्तू पाहतो असे म्हणतो तेव्हा ती वस्तू वास्तविक आपल्या मनःपटलावर उमटलेले चित्रण असते. ते चित्रण केवळ मानसिक असल्याने मनाव्यतिरिक्त त्याला वेगळे अस्तित्व नसते. अज्ञानामुळे तेच चित्रण स्थळ काळात परावर्तित केले जाते. आणि आपणच निर्माण केलेले चित्रण पदार्थ या स्वरूपात पाहतो. आपले विचार अगर वस्तू संबंधीचे निरिक्षण स्वतःच्या अनुभवातून निर्माण झालेले असतात. खरे पाहिल्यास त्याना स्थळकालात तसे स्थान नसते. आपल्या सर्वांनाच हा अनुभव येत असतो. परंतु आपले आत्मज्ञान मंदावलेले असते. अथवा सुप्तावस्थेत असते. म्हणून आपल्याला विविधतेचा अनुभव येत राहतो. आणि पदार्थरूपाने आपल्याला भासत राहतो. म्हणजे मनच विश्व निर्माण करते. सापेक्षता सिद्धांताने विश्व संबंधीचे हे अज्ञान उघडकीस आले आहे. आपण विश्व सत्य समजतो हा विचार बरोबर नाही, हे या सिद्धांताने ध्यानात आणून दिले जाते. प्रत्येक बाह्य पदार्थ सत्य असल्याचा दावा करणारा प्रत्येक विचार व कृती म्हणजे

खरोखरच बुद्धी आणि शक्तीचा अपव्यय होय. आणि आत्मज्ञानाच्या दृष्टीने आलेली सुंदर संधी वाया दवडणे होय. आत्मज्ञान झालेली मंडळी इंद्रियांनी दिसणाऱ्या विश्वावर ह्या साठीच विश्वास ठेवीत नाहीत. आणि त्याचे सत्यरुप पाहण्याकडेच त्यांची प्रवृत्ती सदोदित होत राहाते.

सर एडिंग्टन् म्हणतात,' विश्वाची पूर्णता ही काही अगळी आहे. त्याच्याशी व्यावहारिक जगाची तुलनाच करता येत नाही. व्यावहारिक जग म्हणजे एक स्वप्न आहे. म्हणून पूर्णतेची जाणीव ही इतर सर्व व्यावहारिक अपूर्ण अशा जगात जाणिवेचा बोध करून देत नाही. याचाच अर्थ विश्वाचे अस्तित्व सापेक्ष आहे आणि विविधतेचा भास निर्माण करणारे आहे. आपण आपल्या भोवती जे काही पाहातो ते विश्व नसून विश्व विशिष्ट समजून आहे. हे भौतिक जग केवळ चैतन्याची छाया आहे. पदार्थ वा विश्व मानणे हाच एक मोठा भ्रम आहे.' हा वैज्ञानिक वेदान्त विचाराच्या किती जवळ आलेला आहे हे यावरून ध्यानात येईल. जीन्स म्हणतो, सापेक्ष सिद्धांताप्रमाणे जग म्हणजे एक स्वप्न आहे. म्हणून सामान्य तत्ववेत्ते अद्वैत अगर सच्चिदानंद असे म्हणतात. ज्ञानाच्या भूमिकेवरून शंकराचार्य मनुष्याला जगाचे दर्शन घडवितात. मानवाला पूर्णतेचे दर्शन घडविणारे आचार्य पलायनवादी कसे ? त्यांचे तत्वज्ञान नितांत आशावादी आणि मानवाला श्रेष्ठ पदाला पोचविणारे तत्वज्ञान आहे.

श्री. शं. बा. मठ, एम. ए. (संस्कृत)

६, कुमार आशिष,

राम मारुती रोड, ठाणे.

• • •

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक शिक्षण संस्था

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक)

३) आनंदीबाई जोशी विद्यालय (प्राथमिक)

४) आनंदीबाई जोशी विद्यालय (माध्यमिक)

५) बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय.

७) टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे तंत्र निकेतन

९) व्यवस्थापन अभ्यास संस्था

१०) प्रगत अभ्यास संस्था (Advanced Study Centre)

## दिशा

**वर्गणी २५०/-**

**लेख व वर्गणी पाठविण्याचा**

पत्ता-

विद्या प्रसारक मंडळ

डॉ. बेडेकर विद्या मंदिर,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

दूरध्वनी : ५४२ ६२७०

# नारायण मूर्ती - एक टेक्नोवादळ

इन्फोसिसचे नारायण मूर्ती, त्यांचे विचार व कर्तृत्व व त्यानिमित्ताने भारतीय व जागतिक पातळीवरही आय.टी. क्षेत्रात घडू पाहणाऱ्या बदलांबाबतचे विचार या लेखात आले आहे. - संपादक

सुमारे २० वर्षांपूर्वी लावलेल्या इन्फोसिस टेक्नॉलॉजी या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे. इन्फोसिस टेक्नॉलॉजी आणि नारायण मूर्ती या दोन अभिन्न गोष्टी आहेत. सर्वसाधारण औद्योगिक यशाच्या फुटपट्टीने मोजल्यास इन्फोसिस टेक्नॉलॉजीला भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर निर्विवाद महान यश मिळाले आहे. त्याविषयी बरेच लिहिले गेले आहे. परंतु हे यश ज्या वेगवेगळ्या संदर्भात मिळालेले आहे त्या संदर्भाचे भान ठेवणे महत्त्वाचे ठरेल.

एक म्हणजे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचे, तंत्रज्ञानाचे, संगणकाचे वाढते महत्त्व, दुसरे म्हणजे भारतातील मानवी ज्ञानभांडवलाचा असलेला साठा, तिसरे म्हणजे महत्त्वपूर्ण बदल, चवथे म्हणजे या सर्व पार्श्वभूमीवर इन्फोसिस टेक्नॉलॉजी कंपनी चालवताना पाळली गेलेली काही नीतीमूल्ये.

लौकिक अर्थाने कंपनीची जशी विलक्षण वाढ झाली, त्याचबरोबर राबवली गेलेली नीतीमूल्ये तेवढीच महत्त्वाची आहेत. त्याचा ज्ञानमय आर्थिक संरचनांशी जेवढा संबंध आहे तेवढेच ते वेगळ्या घाटणीमुळे भारतीय आगामी अर्थ रचनेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते. यामुळे कंपनी संचालनाच्या विशिष्ट संस्कृतीचा एक आदर्श भारतापुढेच नाही तर जगापुढे घालून दिला गेला आहे.

नारायण मूर्तींच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या साध्या राहणीबद्दल, विनयशीलतेबद्दल, नम्रतेबद्दल, कंपनीच्या फायद्यात व्यापक पायाला सहभागी करण्याबद्दल, समाजाभिमुखतेबद्दल, शैक्षणिक प्रेमाबद्दल तर नेहमी बरेच लिहिण्यात आलेच आहे. त्यांचे असे मत आहे की एखाद्या कॉर्पोरेशनला घोडदौड करायची असेल तर त्या कॉर्पोरेशनकडे ठोस नैतिक कार्यपद्धतीचा पाया असला पाहिजे. असे असेल तरच तुमची कॉर्पोरेशन इतर कॉर्पोरेशनच्या तुलनेने प्रगल्भ ठरेल. त्यामुळे तुम्हाला एक वेगळी शक्ती, वेगळे चैतन्य प्राप्त होऊ शकते. इन्फोसिसमध्ये नेहमी सांगितले जाते की तुम्हाला रात्री लागणारी गाढ झोप अब्जावधी डॉलर्सच्या मोलाची आहे!

इन्फोसिसमध्ये कोणत्याही प्रश्नावर विचार होताना तो जागतिक संदर्भातच करायची सर्वांना सवय आहे. त्यामुळे सॉफ्टवेअर विकासातच नाही तर उत्पादनांची गुणवत्ता, गिऱ्हाइकांच्या अपेक्षा, मार्केटिंग, वित्त, तंत्रज्ञान, औद्योगिक संरचना, मानवी ज्ञानभांडवल या सगळ्या बाबतीत आपोआप जागतिक दर्जा गाठला जातो. तुमची कार्यशैली वेगवान, कल्पक आणि अतिकुशल या गुणांवर नेहमीच आणि सर्वत्र, सर्व बाबतीत आहे याची सतत काळजी घेतली पाहिजे. एका यशस्वी कॉर्पोरेशनसाठी हे आवश्यक आहे की आपल्या प्रत्येक कृतीमध्ये असलेले संभाव्य धोके नेमके जोखणे आणि त्या धोक्यांचे क्षालन करणे.

नारायण मूर्ती म्हणतात की हे वर मांडलेले मुद्दे इन्फोसिसचे संचालन करताना आलेले नाही बहुमोल अनुभवच आहेत. इन्फोसिसने काही महत्त्वपूर्ण तत्त्वे आदर्शवत मानली आहेत. आणि पाळली आहेत.

१. तज्ज्ञ मंडळींना आपला देश सोडून न जाता येथेच पाय रोवून उभे राहून, सामूहिक प्रयत्नांच्या जोरावर संपत्ती निर्माण करणे शक्य आहे.

२. कॉर्पोरेशनचे संचालन प्रामाणिकपणे करणे शक्य आहे.

३. जर तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना फायद्याचे वाटेकरी बनवलेत तर तुमची स्वतःची संपत्ती देखील वाढत जाते.

४. जर तुम्ही कॉर्पोरेशनचा कारभार संचालनांच्या तत्वावर आधारित ठेवलात आणि गुंतवणुकदारांना वेळोवेळी विश्वासात घेतलेत तर गुंतवणूकदार तुमचा फायदा करून देतात.

५. भारतातून जागतिक दर्जाशी स्पर्धा करणे शक्य आहे.

६. स्वतःच्या नवनिर्मिती कालबाह्य ठरवून तुम्ही कॉर्पोरेशनच्या आतमध्ये नवनिर्मितीसाठी प्रोत्साहन आणि सुयोग्य वातावरण तयार करू शकता.

७. दोन कॉर्पोरेशन्समध्ये स्पर्धा कायम ठेवून देखील तुम्ही एक खुले, मैत्रीपूर्ण नाते तयार करू शकता. माहितीची देवाणघेवाण करू शकता. नारायण मूर्ती आणि अझिम प्रेमजी यांमध्ये अशाच प्रकारचे नाते आहे. ते एकमेकांचे मित्र आहे, अनेक वेळा भेटतात, त्याचबरोबर इन्फोसिस टेक्नॉलॉजी आणि विप्रो यांमध्ये जोरदार चढाओढ आहे.

८. तुम्ही कोणताही निर्णय घेता तेव्हा खाजगी हितापेक्षा सार्वजनिक हितांना प्राधान्य देणे. इतकेच नाही तर इन्फोसिसचा अनुभव हेच सांगतो की असे केल्यानेच खाजगी हितांचे अधिक चांगले रक्षण होऊ शकते.

हा शेवटचा मुद्दा अतिशय मोलाचा आणि महत्त्वाचा आहे. तो मागासलेल्या देशांसाठी विशेष महत्त्वाचा आहे असे नारायण मूर्ती ठासून सांगतात. पाश्चात्य देशांमध्ये या गोष्टीचे विशेष महत्त्व नसेल, परंतु मागासलेल्या देशांमध्ये यशस्वी कॉर्पोरेशन चालवताना असे केल्यानेच कॉर्पोरेशन आणि खाजगी हिताचे देखील संरक्षण होते आणि आर्थिक विकास होतो.

नारायण मूर्ती आपल्या प्रत्येक गौरवात आपल्या सहकाऱ्यांचा आवर्जून उल्लेख करतात. एन. एस्. राघवन, नंदन निलेकणी, गोपालकृष्णन, के. दिनेश, शिबूलाल, अशोक अरोरा हे ते सहा सहकारी होत. यांपैकी अशोक अरोरा इन्फोसिस सोडून गेले असले तरी त्यांच्याशी आज देखील घनिष्ठ संबंध आहेत. नारायण मूर्ती म्हणतात की जर त्यांना इन्फोसिस परत नव्याने उभारायला सांगितली तर ते हेच सहकारी आणि इन्फोसिस भोवतालची हीच सर्व माणसे घेऊन उभारणी करतील ! आपल्या सहकाऱ्यांबद्दल याहून कोणता वेगळा विश्वास दाखवता येईल ? आपल्या यशात आपली सुविद्य पत्नी सुधा यांचा वाटा असल्याचे सांगायला ते कधीच विसरत नाहीत. त्याचप्रमाणे आपल्या आई वडिलांकडून आपल्याला खाजगी हितापेक्षा सार्वजनिक हितांना प्राधान्य देण्याचे बाळकडू मिळाल्याचे ते अभिमानाने सांगतात. अशा प्रकारे आपल्या परिसराशी, आपल्या देशाशी, आपल्या संस्कृतीशी आणि त्यातील चांगल्या गुणांशी नाळ असलेला आणि त्याचबरोबर जागतिक स्तरावरील अत्याधुनिक विचारसरणींचे, परिस्थितीचे भान असलेला हा माणूस आहे. भारताला सध्या अशाच प्रकारच्या नेतृत्वाची, दिशेची प्रकर्षाने गरज आहे.

१९८१ साली या पाच मित्रांनी जेव्हा कंपनीची मुहूर्तमेढ रोवली तेव्हा त्यांनी दहा हजार भांडवलावर सुरुवात केली. त्यावेळी त्यांचे बँकर्स म्हणजे त्यांच्या बायकाच होत्या ! दीपक पारेख नावाच्या मित्राच्या कृपेने पुण्यात ७५० चौरस फुटांचा ब्लॉक मिळाला तेथेच सुरुवातीचे काम चालत असे. नारायण मूर्ती म्हणतात की जेव्हा तुम्ही

चांदण्यात हात घालता तेव्हा बहुदा तुम्हाला चांदण्या मिळत नाहीत हे खरे असले तरी तुमचे हात चिखलाने देखील माखत नाहीत !

इन्फोसिस टेक्नॉलॉजीची कमाई १९९८-१९९९ साली ५१३ कोटी रुपये होती. १९९९-२००१ मध्ये ९२१ कोटी रुपये होती. तर २०००-२००१ मध्ये ती १९६० कोटींवर गेली. १९९९-२००० मध्ये कर भरल्यानंतर राहिलेला नफा २९४ कोटी रुपये होता तो २०००-२००१ मध्ये ६२९ कोटी रुपयांवर गेला. मागील दोन वर्षांत जगभरात, भारतात देखील जो आर्थिक मंदीचा तडाखा बसला आणि विशेष करून माहिती तंत्रज्ञान उद्योगाला जो तडाखा बसला त्यात भल्या भल्या कंपन्यांची देखील गाळण उडाली. ज्या काही थोड्या कॉर्पोरेशन्स आपल्या पताका उडवत राहिल्या त्यात इन्फोसिस टेक्नॉलॉजीचा अढळ तारा विशेष नजरेत भरण्यासारखा होता. या कालखंडात त्यानं असे धोरण अवलंबिले की केवळ अमेरिकन बाजारपेठेवर अवलंबून राहायचे नाही. त्याप्रमाणे जपान, जर्मनी तसेच इतर अनेक देशांतील कंपन्यांशी संबंध आणि कारभार प्रस्थापित करण्यात आला.

मागील २० वर्षांतील बहुमोल अनुभवांविषयी नारायण मूर्ती सांगतात की कॉर्पोरेशन चालवतांना एकूण रणनीतीचा नीट विचार करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. रणनीती हा तुमच्या सर्व कृतींचा आत्मा असतो. बाजारपेठेत स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण जागा तयार करणे, आपल्या क्षेत्रात एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचा प्रवेश, आपले ग्लोबल डिलिव्हरीसारखे महत्त्वपूर्ण मॉडेल जागतिक बाजारपेठेत पाठवणे यासारख्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नासाठी रणनीतीत्मक धोरणांचे पथप्रदर्शन आवश्यक असते.

इन्फोसिसचा आणखी एक महत्त्वाचा अनुभव हे सांगतो आणि त्याचे पालन आम्ही अगदी सुरुवातीपासून १९८१ पासूनच केले आहे, ते म्हणजे कोणत्याही नव्या प्रकल्पाची सुरुवात करतानां मुख्य जबाबदार गटामध्ये कौशल्य, अनुभव आणि अभ्यास यांचे वैविध्य असावे, त्याचबरोबर जबाबदाऱ्या सामूहिक असाव्यात. नारायण मूर्तींच्या मते हे अमेरिकेत महत्त्वाचे नसेल, पण भारतात या गोष्टीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

इन्फोसिस टेक्नॉलॉजीतील आजवरच्या कामाचा आणखी एक महत्त्वाचा अनुभव कर्मचाऱ्यांबद्दलचा आहे. इन्फोसिस ही मानवी ज्ञानभांडवलावर आधारलेली कंपनी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. ही गोष्ट उद्या दिवसेंदिवस सर्वच उद्योगधंद्यात वाढत जाणार असल्याने या अनुभवाचे महत्त्व जास्तच आहे. तर तुम्हाला उत्कृष्ट पद्धतीचे मानवी ज्ञानभांडवल आकर्षित करून घ्यावयाचे असेल तर तुम्हाला तज्ज्ञांचा आदर करावा लागेल, त्यांचे रक्षण करावे लागेल. हे करण्यासाठी सर्व जुनाट मानवी संबंध हाताळणीचा त्याग करावा लागेल. तज्ज्ञांशी वागताना खुलेपणा, पारदर्शिता, योग्यायोग्यता, कामांचे आणि योगदानाचे योग्य मूल्यमापन या सर्व गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात. तज्ज्ञांशी झालेल्या देवघेवींमध्ये वजावाकी शून्य होईल असे बघावे लागते, तरच कंपनीत भेदभाव, गटबाजी टाळता येते.

सरकारी कायद्यांविषयी इन्फोसिसकडे सुरुवातीपासून असे धोरण अवलंबिले की देशातील सर्व कायद्यांचे पालन करायचे. याबद्दल इन्फोसिसने टिस्को या कंपनीचा आदर्श नेहमी डोळ्यापुढे ठेवला. यामुळे कंपनी आणि समाज यांमध्ये जे संतुलित नाते तयार होते ते प्रदीर्घ दृष्टीने फार महत्त्वाचे ठरते.

भविष्यकालीन योजनांबद्दल नारायण मूर्ती म्हणतात की इन्फोसिस टेक्नॉलॉजी ही जागतिक पातळीवरील एक महत्त्वपूर्ण सॉफ्टवेअर कंपनी व्हावी. त्यासाठी शिकण्याची प्रक्रिया सतत चालू राहिली पाहिजे. जागतिक पातळीवर तसेच भारतात आय.टी. उद्योगाच्या दृष्टीने पुढील गोष्टी महत्त्वाच्या ठरणार आहेत. या पुढील

काळात आय.टी. सेवांचा उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. दुसरे म्हणजे प्रत्येक फर्मने बाजारातील आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणे महत्त्वाचे ठरेल. तिसरे म्हणजे प्रत्येक कॉर्पोरेशनने आपली वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैली विकसित करणे महत्त्वाचे ठरेल. चवथे म्हणजे आम बाजारासाठीच गिऱ्हाइकांसाठी विशेष सॉफ्टवेअर तयार करण्याची गरज दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत सॉफ्टवेअर कामाचे मूल्यमापन सरसकट न होता प्रगल्भतेने आणि काळजीपूर्वक करण्यावर भर दिला जाण्याची शक्यता निर्माण होते.

आतापर्यंत आपण जे विवेचन केले त्यामध्ये भारताच्या उद्योग आणि कॉर्पोरेशन जगतात नारायण मूर्ती आणि इन्फोसिस टेक्नॉलॉजीने आपला वेगळा ठसा कसा उमटवला आहे ते दिसून येते. या सर्वांचे आता आपण समजतो त्यापेक्षा जास्त दूरगामी परिणाम देखील संभवतात. यातच त्याचे वेगळेपण दडलेले आहे. पण त्याचा आपल्या देशासाठी फायदा घ्यायचा असेल तर वर म्हटल्याप्रमाणे आजच्या जागतिक स्थितीचा, आजच्या वैशिष्ट्यपूर्ण कालखंडाचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक ठरते.

सध्याच्या युगाचे वैशिष्ट्य हे आहे की मानवी समाजाचा औद्योगिक युगातून ज्ञानयुगात होत असलेला प्रवेश. अशा प्रकारचे कालखंड इतिहासात वारंवार येत नाहीत. पण नेहमी असेच घडते की त्या त्या काळात जगणाऱ्या लोकांना या बदलत्या परिस्थितीचा अंदाजच येत नाही.

गेल्या काही वर्षांत माहिती, ज्ञानाचे अर्थव्यवस्थेतील वाढते महत्त्व तसे सर्वमान्यच झाले आहे. संगणकाचा उदय जरी दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस झाला असला तरी खऱ्या अर्थाने माहिती तंत्रज्ञानाच्या युगाचा विकास १९७० ते २००० या कालखंडात आणि इंटरनेटचा विकास शेवटच्या दशकात झाला. माहिती तंत्रज्ञानामुळे माहितीचा मोठ्या प्रमाणात साठा करणे, विश्लेषण करणे आणि त्याच्या प्रती काढून वेगाने प्रक्षेपण करणे सहजशक्य झाले आहे. अतिशय स्वस्त देखील झाले आहे. औद्योगिक युगातील तंत्रज्ञानामुळे सर्वसाधारणपणे माणसांच्या स्नायूंची ताकद वाढली तर, माहिती तंत्रज्ञानामुळे माणसाच्या बुद्धीची ताकद वाढली.

माहिती तंत्रज्ञानाचा ज्या वेगाने आणि ज्या प्रमाणात जगभरात प्रसार झाला आणि यापुढे होणार आहे त्याची तुलना होऊ शकत नाही. त्याचे इतर कारणांबरोबर एक महत्वाचे कारण म्हणजे माहिती तंत्रज्ञाने उत्तरोत्तर स्वस्त होत जाणे. दुसरे कारण म्हणजे '' जाळ्याचा परिणाम''. जेव्हा अनेक उपकरणे किंवा वस्तू एकमेकांशी जाळ्याने बद्ध असतात तेव्हा जाळ्यातील वस्तूंची संख्या वाढल्यास मूल्यवृद्धी केवळ त्या संख्येच्या प्रमाणात होत नाही, तर त्या संख्येच्या गुणोत्तराच्या प्रमाणात होते. जसे समजा तुम्ही तुमच्या घरी टेलिफोन घेतला तर मूल्यवृद्धी एका टेलिफोनची होत नसते, तर त्यापेक्षा कितीतरी जास्त होते. कारण तुमचा टेलिफोन असंख्य टेलिफोन्सना जोडलेला असतो. तिसरे म्हणजे आणखी एक महत्त्वाचे कारण हे आहे की ज्ञान व वस्तूंच्या अंगी काही अनोखेच गुणधर्म असतात. औद्योगिक युगातील वस्तू एकावेळी एकाच ठिकाणी वापरता येतात. तर एकच ज्ञानवस्तू एकाच वेळी अनेक जण अनेक ठिकाणी वापरू शकतात. अक्षरशः लक्षावधी, कोट्यावधी लोक वापरू शकतात ! ज्ञानवस्तूंच्या प्रती काढणे नगण्य खर्चाचे असते आणि ज्ञानवस्तूंचे संप्रेक्षण स्वस्तात तसेच वेगाने करता येते. या व तसेच इतर कारणांनी माहिती तंत्रज्ञानाचा कल उत्तरोत्तर स्वस्त होत जाण्याचा असतो.

माहिती तंत्रज्ञानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा सार्वत्रिक उपयोग तसेच सर्वव्यापित्व. याबाबतीत त्याची पूर्वीच्या तंत्रज्ञानांशी

क्वचितच तुलना होऊ शकते. संगणकाचा उपयोग सर्वच क्षेत्रात होतो. किंबहुना संगणक वापरता येणार नाही असे एकही क्षेत्र सापडणे कठीण आहे. या गुणधर्मांमुळे देखील माहिती तंत्रज्ञानाचा जगभरात वेगाने प्रसार झाला आहे आणि होत आहे.

संगणकाचा उपयोग माहिती साठवणे, तिचा उपयोग करणे, आणि वेगाने संप्रेषण करणे एवढ्यापुरताच सीमित नाही. तसे असते तर माहिती तंत्रज्ञान मर्यादित अर्थानेच महत्त्वाचे ठरले असते. संगणक 'प्रश्न सोडवण्याचे यंत्र' म्हणून काम करू शकतो. याचे कारण असे आहे की, संगणक म्हणजे केवळ आकडे मोड करणारे यंत्र नव्हे, तर अमूर्त चिन्हांचा साठा आणि त्यावर प्रक्रिया करणारे यंत्र आहे. माणसाची विचार करण्याची पद्धती याच्याशी जुळणारी अशीच आहे.

संगणकामुळे नवनिर्माणांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे आणि यापुढे होणार आहे. संगणकात अशी ताकद आहे की जगातील बहुतेक सर्व क्षेत्रांतील सर्वच प्रक्रिया प्रत्यक्षात न करता लुटूपुटूच्या लढाईसारख्या पडद्यावर करून बघता येतात. त्यांच्या संभाव्य परिणामांचा, गुणधर्मांचा देखील अंदाज बांधता येतो. या सगळ्याला जरी प्रत्यक्ष प्रयोगांची सर आली नाही तरी बऱ्याच चाळण्या लावण्याचे काम यातून होते. यामुळे सर्वात महत्त्वाची गोष्ट घडते ती म्हणजे नवनिर्माणांचे खर्च आणि त्यासाठी लागणारा वेळ यांची प्रचंड बचत होते. या सगळ्या अर्थशास्त्रामुळे नवनिर्माणांचा वेग वाढत जातो. नवनिर्माणांचा वेग वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे पूर्वीच्या तुलनेने आता मानव जातीकडील माहिती आणि ज्ञानाचे साठे देखील भरपूर वाढत चालले आहेत, ज्यांच्या आधारावर नवी नवनिर्माणे घडतात.

१९८६ मध्ये पॉल रोमर या स्टॅनफोर्ड विद्यापीठांत काम करणाऱ्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनी एक अतिशय क्रांतीकारी अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडला. एखाद्या देशात आर्थिक वाढ कोणत्या कारणांनी होते हा या संशोधनाचा मुख्य विषय आहे. गेल्या शंभर वर्षांत उत्पादकतेत वाढ झाली आहे. त्याची ढोबळमानाने दोन कारणे दिसतात. एक म्हणजे तांत्रिक प्रगती आणि दुसरे म्हणजे या तांत्रिक प्रगतीमध्ये प्रशिक्षित झालेल्या मानवी ज्ञानभांडवलाचा साठा.

'आंतरिक वाढीच्या सिद्धांता'ची क्रांतीकारकता यामध्ये समावलेली आहे की हा सिद्धांत मागासलेल्या देशांसाठी पर्यायी आर्थिक नीतीचा पथप्रदर्शक होऊ शकतो. पारंपारिक आर्थिक सिद्धांत जगाला हे सांगत होते की जागतिक व्यापारामुळे मागासलेल्या देशांची आर्थिक उन्नती होईल. हा सिद्धांत ते म्हणणे खोडून काढतो आणि सांगतो की प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानात्मक नवनिर्माण यांवर भर दिल्यानेच एखाद्या देशाची प्रगती होऊ शकते. या कारणाने आंतरिक वाढीचा सिद्धांत आज होत असलेल्या जागतिकीकरणाचा टीकाकार बनतो. कारण आजचे जागतिकीकरणाचे मॉडेल हे प्रामुख्याने जागतिक व्यापाराच्या संकल्पनेवर आधारलेले आहे. हे मॉडेल डेव्हिड रिकार्डो या अभिजात अर्थशास्त्रज्ञाच्या या सिद्धांतावर आधारलेले होते की प्रत्येक देश एखाद्या विशिष्ट क्षेत्रात औद्योगिक प्रभुत्व मिळवेल. मग ते गुण्यागोविंदाने एकमेकांशी जागतिक व्यापार करतील. अशा प्रकारे सर्वच देशांना आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फायदा होईल वगैरे. पण या विचारसरणीत एक दोष आहे तो म्हणजे एखाद्या देशाच्या निर्यात क्षेत्रावरच बाहेरच्या देशातील भांडवलाचा ताबा असेल तर ? रोमरच्या सिद्धांतामुळे हे स्पष्ट झाले आहे की एखाद्या देशाचा विकास त्या देशातील ज्ञान, तंत्रज्ञानाच्या साठ्यावरच मुख्यत: अवलंबून असते.

आंतरिक वाढीचा सिद्धांत नेमका काय ते थोडक्यात सांगायचे तर पारंपारिक आर्थिक वाढीच्या

सिद्धांतात केवळ दोन गोष्टींचा विचार केला गेला होता, त्या म्हणजे भांडवल आणि श्रम. त्या मॉडेलप्रमाणे तंत्रज्ञान ही आर्थिक विचाराच्या दृष्टीने बाह्य गोष्ट होती. प्रत्यक्ष उत्पादनाचा भाग बनविल्याशिवाय ती अर्थशास्त्रीय वस्तू बनू शकत नव्हती. त्यामुळे संशोधनामागील प्रेरणा अर्थशास्त्राचा गाभा बनू शकत नव्हत्या. त्यांचा संबंध असलाच तर तो थोडा दूरावस्थेत होता.

रोमरच्या सिद्धांतानुसार एखाद्या देशाच्या आर्थिक वाढीसाठी भांडवल, श्रम, मानवी ज्ञानभांडवल आणि ज्ञान अशा चार गोष्टींचा एकत्रित विचार करायला हवा. म्हणजे या ठिकाणी ज्ञान, नवनिर्माण या अर्थशास्त्रबाह्य गोष्टी न राहता अंतर्गत गोष्टी बनतात. त्यांचा अर्थशास्त्रीय भूमिकेतून साकल्याने विचार करता येतो.

आंतरिक वाढीच्या सिद्धांताचा आणखी विकास केला आणि तो विशेषत: मागासस्थितींना लावण्याचा प्रयत्न केला तर बऱ्याच गोष्टी संभवतात. उदाहरणार्थ कामगारांचा नवनिर्मितीसाठी उपयोग, तो देखील सामुदायिक पातळीवर करण्याची मॉडेल्स तयार करणे शक्य आहे. त्याचप्रमाणे मागास देशांनी भरमसाठ भांडवलाचा मार्ग टाळून आपल्याकडील मानवी ज्ञानभांडवल वाढवणे आणि त्याचा सुयोग्य पद्धतीने वापर करणे असे पर्यायी विकास कार्यक्रम आखणे शक्य आहे. रोमरच्या म्हणण्यानुसार प्रत्येक देशाने विकासाची वागडोर स्वत:च्या हातात घेतली पाहिजे. तरच त्या देशाला ज्ञानयुगात आपले अस्तित्व टिकवता येईल.

या सगळ्या जागतिक पातळीवरील बदलांची पार्श्वभूमी नारायण मूर्ती आणि इन्फोसिस टेक्नॉलॉजीच्या यशामागे दडली आहे हे येथे स्पष्ट झाले तरी पुरेसे आहे. परंतु यामुळे नारायण मूर्ती यांचे महत्त्व तिळमात्र देखील कमी तर होत नाहीच. किंबहुना ते अधिकच वाढते आणि उजळून निघते. याचे कारण हे आहे की खरे यश हे नेतृत्वगुणांवर अवलंबून असते. १९८० साली बदलत्या काळाची चाहूल ओळखणे, त्या दृष्टीने योग्य ती पावले टाकणे, आवश्यक ती संघटना बांधणे यातच नारायण मूर्ती यांची थोरवी दडली आहे. एक चीनी म्हण आहे की निकृष्ट नेतृत्व ते की जो सर्व काही मी केले आहे असे म्हणते, उत्कृष्ट नेतृत्व त्याचे ज्याने सर्व काही केले आहे असे बाकीचे सर्व म्हणतात, पण सर्वोत्कृष्ट नेतृत्व ते की ज्या संघटनेत प्रत्येकाला वाटते की आपण सर्व केले आहे. नारायण मूर्ती हे अर्थातच या तिसऱ्या प्रकारात मोडतात. त्यांचे काम काळाची चाहुल ओळखण्याचे आणि पथप्रदर्शकाचे आहे. त्यांनी केलेली उभारणी एका मागासलेल्या देशात केलेली यशस्वी उभारणी आहे, त्यामुळे त्याचे महत्त्व अधिक वाढते.

आता भारतातील बदल आणि त्या पार्श्वभूमीवर नारायण मूर्ती यांच्या कार्याची दखल यावर आपण विचार करू. भारतातील आय.टी. उद्योगाची वाढ झाल्यामुळे मध्यंतरीच्या काळात भारतात आलेली मरगळ काही प्रमाणात दूर होण्यास आणि भारताला एक वेगळे आत्मबळ, वेगळा चेहरा मिळण्यास मदत झाली आहे यात शंका नाही. भारतीय संस्कृती ही जगातील एक प्राचीन संस्कृती आहे आणि भारतात ज्ञानाला प्राचीन काळापासून विशेष महत्त्व देण्यात आले आहे. आता आधुनिक काळात जगामध्ये ज्ञानाला एका नव्या अर्थाने महत्त्व प्राप्त होत आहे. अशा वेळी आय.टी. च्या मदतीने भारताचे नाव जगाच्या नकाशावर येणे ही आशादायक गोष्ट आहे.

आजवर जे साध्य झाले ते सहजसाध्य झाले असे कोणी समजू नये. आता आय.टी. हे चलते नाणे झाले असले आणि आय.टी. ला प्रोत्साहन दिले जात असले तरी या क्षेत्रात सुरुवात करणाऱ्यांना खडतर परिस्थितीतून जावे लागले होते. १९६०, १९७० च्या दशकांत भारतात काही प्रमाणात संगणकाचा वापर सुरू झाला असला तरी या तंत्रज्ञानाबद्दल सरकारी पातळीवर अज्ञान होते. इतर उद्योगांवर असलेले निर्बंध, नियम सरसकट लावल्यामुळे

अनेक जाचक अटी होत्या की ज्यामुळे या क्षेत्रात काम करणे जवळजवळ अशक्य होते. नारायण मूर्ती म्हणतात त्यावेळी डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी इतक्या परवानग्या घ्याव्या लागायच्या की कंपन्यांना, तसेच संशोधन संस्थांना देखील आधुनिक तंत्रज्ञान मिळवणे जवळजवळ अशक्य होऊन बसायचे. मोठ्या कॉर्पोरेशन्सनी किती संगणक वापरावचे ते त्यांना ठरवता येत नसे. जगामध्ये फक्त भारतातच ही परिस्थिती असावी असे नारायण मूर्ती म्हणतात. त्याचप्रमाणे कॉर्पोरेशन्सनी कोणत्या प्रकारचे संगणक वापरावेत याचा निर्णय देखील ते घेऊ शकत नव्हते. या बाबत जे निर्णय घ्यायचे त्यांना त्याबद्दलची कोणतीच विशेष तांत्रिक माहिती नसायची. संगणकांची खरेदी करायची असल्यास दिल्लीला ९ ते १२ महिने खेट्या घालाव्या लागायच्या ! त्यानंतरची पुढची अडचण म्हणजे सुटे भाग. त्यांच्या आयातीवर देखील अशीच अनेक प्रकारची बंधने असायची. तरी देखील आपल्या देशात अनेक कंपन्यांनी आणि संशोधन संस्थांनी बऱ्यापैकी संगणीकरण केले होते असे नारायण मूर्ती नमूद करतात.

दुसरा अडथळा होता आयात शुल्काचा. ते सर्व साधारणपणे १०० ते १५० टक्के असायचे. आयात शुल्क जास्त बसविण्यामागे भूमिका ही असते की त्याचे देशांतर्गत उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे. ते इतर अनेक तंत्रज्ञानांबद्दल खरेही असले तरी तोच नियम संगणकासारख्या हाय टेक उत्पादनांना लावण्यात काहीच अर्थ नव्हता.

या सगळ्याचा परिणाम असा झाला की भारताकडे ज्ञान, तंत्रज्ञानाची बाजू मजबूत असून देखील कॉर्पोरेशन्स, संशोधने संस्था, शिक्षणसंस्था या पुरेशा कॉम्प्युटिंग पॉवर पासून वंचित राहिल्या, भुकेल्या राहिल्या. त्यामुळे भारताचे किती वर्षे, किती प्रकारे नुकसान झाले असेल ते सांगणे ही कठीण आहे आणि त्याची कल्पनाही करवत नाही. तसे झाले नसते तर आज आपण चीन आणि दक्षिण - पूर्व आशियाच्या बरोबरीला नक्कीच असतो, कदाचित त्यांच्या कितीतरी पुढे गेलो असतो. याबद्दल नारायण मूर्ती अभिमानाने सांगतात की याच काळात अडथळ्यांना न जुमानता भारतात अनेक प्रकल्प राबवण्यात आले आणि यशस्वी करुन दाखवण्यात आले. हे बहुसंख्य प्रकल्प सरकारी, निमसरकारी क्षेत्रातील होते.

याच कठीण परिस्थितीत विप्रो आणि एच.सी.एल. या दोन खाजगी कंपन्यांनी आपली चमक दाखवली. त्याचप्रमाणे याच कालखंडात भारतातील आय.आय.टी., आय.आय.एम. वगैरे उच्च दर्जाच्या शैक्षणिक संस्थांनी मोठ्या प्रमाणात सकस मानवी ज्ञानभांडवल निर्मिण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

भारतीय सॉफ्टवेअर उद्योगासाठी १९९१-१९९८ या कालखंडात डॉ. मनमोहन सिंग यांनी सुरु केलेल्या आर्थिक सुधारणांचा काल खंड फार महत्त्वपूर्ण ठरला ! त्या काळातील आर्थिक सुधारणा आणि त्याचे परिणाम हा वेगळा अभ्यासाचा विषय आहे आणि त्यावर अनेक मतमतांतरे होऊ शकतात. उद्योगासाठी पुढील गोष्टी महत्वाच्या ठरल्या -

१) शेअर मार्केट मधून आर्थिक उभारणी करणे सुकर झाले. २) निर्णय प्रक्रिया वेगवान झाली. ३) परकीय चलनावरील बंधने शिथील झाली. ४) परकीय कंपन्यांना १०० टक्के गुंतवणुकीची परवानगी मिळाली. ५) कर, अभिभार, आयात शुल्क यांची आकारणी कमी झाली आणि सुटसुटीत करण्यात आली. ६) माहितीच्या दळवळणाच्या सोयी वाढल्या. ७) व्हेंचर भांडवलाला परवानगी देण्यात आली.

नारायण मूर्ती सांगतात की १९९८ साली भारताचा आय.टी.वरील खर्च सुमारे ३ अब्ज डॉलर्स एवढा

होता. त्यात सुमारे २ लाख लोक काम करीत होते. वार्षिक उत्पन्न सुमारे ४ अब्ज डॉलर्स एवढे झाले. पुढील दृष्टीने नारायण मूर्ती एक अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दा मांडतात. तो म्हणजे भारतात भविष्यकाळात आय.टी. सेवा मोठ्या प्रमाणात वाढण्याची आणि त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होण्याची संधी आहे. त्यांच्या मते त्यामुळे २० ते ३० लाख तरुणांना देशभरात रोजगार तयार होतील आणि त्यांना मासिक १०,००० रुपये वेतन मिळू शकते. त्या दृष्टीने भारतात आतापासून काळजीपूर्वक नियोजन करावे असे ते सुचवतात.

आपण आतापर्यंत नारायण मूर्ती यांच्या कार्याचा आणि त्या निमित्ताने जागतिक पातळीवर आणि भारतात घडणाऱ्या बदलांचा मागोवा घेतला. भारतीय जनतेला नारायण मूर्तींकडून काय अपेक्षित आहे ? त्या बद्दल संक्षेपाने जाताजाता मांडणे संयुक्तिक होईल.

नारायण मूर्तींकडून आम्हाला आजवर जे काही मिळाले आहे ते तर अजून मोठ्या प्रमाणात हवे आहेच. पण एक खंत अशी वाटते की मागासलेल्या भारतासाठी अजून आय.टी. हे एक सुधारित बेट आहे. ज्ञान, तंत्रज्ञानाचा हा प्रवाह केवळ पुढारलेल्या देशांशी बद्ध न राहता भारताच्या आंतरभागांत वाहात जावा, प्रवाहित व्हावा. या ज्ञान, तंत्रज्ञानाची भारताच्या विशेषतः ग्रामीण भागाशी सांधेजोड होऊन विकासाच्या नव्या दिशा फुटाव्यात.

आज देखील इन्फोसिसकडून ग्रामीण भागातील विकासासाठी अनेक मदतील योजना राबवल्या जात असतील, शैक्षणिक योजना राबविल्या जात असतील, नाही असे नाही. पण आम्हाला हवा तो ग्रामीण भागात आधुनिक तंत्रज्ञानाचा, ज्ञानाचा मार्ग चोखाळून झालेला विकास. या साठी समर्थ नेतृत्व मिळावे, किमानपक्षी प्रयत्न, प्रयोग व्हावेत हे अपेक्षित आहे.

e-mail : anilshaligram@yahoo.com

**श्री. अनिल शाळिग्राम**

शाळिग्राम निवास, दुसरा मजला,
जुन्या महापालिका इमारतीच्या समोर,
जुना स्टेशन रोड, ठाणे
दूरध्वनी : ५३६२१२२, ५३६१६६६

•••

## ५ जून



**५ जून हा आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन आहे. या निमित्ताने सर्व सामान्य माणसाने पर्यावरण आणि मी, माझा पर्यावरणाशी असणारा संबंध, या बाबत अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. कारण 'पर्यावरणवाले' कोणी वेगळी नसतात. तर आपण सर्वच पर्यावरणवाले असतो.**

# चिंता

*चिता आणि चिंता यात फक्त अनुस्वाराचा फरक आहे. एक मेल्यावर जाळते, दुसरी जिवंतपणी. या जिवंतपणी जाळणाऱ्या चिंतेबद्दल हे चिंतन !- संपादक*

''चिंता-क्लेश-दरिद्र-दुःख अवघे देशांतरा पाठवी '' ही भगवान् श्री मोरयाला (गणेशाला) केलेली प्रार्थना. आपण अगदी 'शुभम्-करोति' लहानपणी म्हणत असल्यापासून आपल्या कानी आहे. ही 'चिंता' मनुष्याला अगदी ग्रासून टाकते, पिंजून काढते, पिचवते. पण काही व्यक्ती कितीही चिंताग्रस्त असल्या तरी ते चेहऱ्यावर कधी दाखवत नाहीत. काही व्यक्तिंच्या चेहऱ्यात लगेच फरक जाणवतो. काही मनातल्या मनात त्या दाबून टाकण्याचा प्रयत्न करतात. एकूण काय 'चिंता' ही अशी भयानक ग्रासून टाकणारी, बाळवीसारखीच 'स्लो-पायझन' करणारी, दणकट मनुष्याला भुईसपाट करणारी, आतून-बाहेरुन पोखरुन काढणारी, एक दुःखदायक, क्लेशदायक मनोविकार आहे असं म्हणायला हरकत नसावी. कारण हा चिंताजनक मनातला विचार जर काही काळ जरी दूर झाला तरी मनुष्यला थोडसं हायसे वाटते. किंवा ह्या चिंतेतून काही योग्य मार्गांनी सुटका झाली तरी मनुष्याला केवढे बर वाटते.

आपण चिंता कशा करता करतो ? या जगात सर्व प्राणि मात्रांना चिंता असतेच. फक्त मनुष्यालाच असते असे नाही. फक्त मनुष्यप्राणी हा सर्व प्राणीमात्रांमध्ये श्रेष्ठ मानला आहे. इतर प्राणिमात्रांना विचार करण्याची आणि ते सांगण्याची, प्रगट करण्याची शक्ति दिलेली नाही. म्हणूनच एखादा माणूस विचीत्र वागला तर त्याला आपण 'माणूस आहे का जनावर आहेस ?' म्हणून विचारतो. कसाई खान्यांत आपल्याला मारुन दोन तुकडे होणार आहेत! हा विचार बकऱ्याच्या, गाईच्या मनांत येत असणारच! पण ते मुकपणाने सहन करण्यापलीकडे ते काहीही करू शकत नाहीत. फक्त त्यांच्या डोळ्यांत ती चिंता आपल्याला म्हणजेच सर्वसाधारण माणसाला दिसते. कसायाला काहीच दिसत नाही, त्याला फक्त दोन तुकडे करायचे असतात, त्याला सुद्धा चिंता असते ती आपल्या नोकरीची !! फाशीची शिक्षा झालेला कैदी आणि कसाई खान्यात मरणारी जनावरे यांच्यात ढोबळ मानाने तसा फरक केला तर 'वाचा' हाच फरक जाणवतो. कारण फासावर जाणाऱ्या कैद्याला शेवटची इच्छा व्यक्त करायला सांगून विचार व्यक्त करायला म्हणजेच बोलते करायला 'चिंता' व्यक्त करायला परवानगी असते. मनुष्य हा आपल्या हुशारीने, बुद्धीचातुर्याने इतर सर्व प्राणिमात्रांवर प्रभुत्व गाजवून समर्थ झाला आहे. प्रत्येक प्राण्याचा आपल्या स्वतःसाठी उपयोग करुन घेतला आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' हा निसर्गनियमच आहे. पोटासाठी इतर प्राण्यांच्या कत्तलीचा किफायतशीर 'धंदा' मनुष्यानेच केला आहे. या विश्वातला सर्वांत बुद्धीमान प्राणी, तितकाच निर्बुद्ध आणि निर्दयी प्राणी हा मनुष्यप्राणी आहे. तो आपल्या स्वार्थाकरता, फायद्याकरता प्राण्यांना त्याच्या मनाला येईल तसे वापरतो. प्राण्यांची पैदास करुन त्यांना खायला प्यायला घालून धष्टपुष्ट करतो आणि त्यांचाच संहार! हत्या करुन त्यांच्या कातडीपासून शिंगापर्यंत सर्व विकून अत्यंत निर्दयीपणे त्यांच्या 'चितेचा' विचारत करतच नाही.

शुभचिंतक, हितचिंतक, चिंतीत होणे, चिंताजनक प्रकृती, चिंताग्रस्त होणे ह्या सर्व 'चिंता' या शब्दाभोवती लागलेली विशेषणे आहेत. मनुष्यप्राणी हा नेहमी उद्याची चिंता करत असतो. किंबहुना तो 'उद्यासाठी' जगत असतो. आणि त्या 'उद्याची' चिंता तो आज पासून करतो. त्यामुळे त्याला वर्तमानात जगणेही कठीण होऊन

बसते. पत्नी-नवऱ्याची, नवरा-पत्नीची, भाऊ-बहिणीची, आईवडील-मुलाची-मुलीची, मुलगी-वडिलांची, उपवर तरुणी आपल्या मनातील नवऱ्याची, गुरु-शिष्याची, शिष्य-गुरुची. अशा सर्व नातेसंबंधात 'चिंता' ही एक बाब चिंताजनक होऊन बसली आहे. पण ह्यामधे एक प्राणी असा आहे की त्याची चिंता करणारी, काळजी वाहणारी दुसरी व्यक्ती आहे. ती कोण ? बघा वर विचार करुन ! तो 'प्राणी' म्हणजे नुकतेच जन्मलेले लहान मूल आणि 'वेडा प्राणी' कारण ह्या दोघांची चिंता करणारी, काळजी वाहणारी, 'आई' किंवा 'दाई' असते. जन्मलेल्या मुलाला कसलीही चिंता नसते. त्याल भूक लागली असेल ? त्याला तहान लागली असेल ? त्याने अंथरुण ओले केले असेल ? ही सर्व चिंता त्याच्या आईला आणि दाईला असते. आपण म्हणतो ना ! 'जगी सर्व सुखी असा कोण आहे ?' तर हे लहान अर्भक सर्वात सुखी आहे. चिंतामुक्त आहे. त्याला फक्त वेदना होतात. भूकंप झाला तरी त्याला चिंता नसते. फक्त भूक लागली की रडू लागते !! याच्या अगदी उलट ! एक लहान मूल त्याच्या आईला दूध विकत आणणे गरिबीमुळे शक्य नसते. आज मिळाले उद्याची शाश्वती नसते. पण ते सुद्धा दोन घोट दूध-पाणी पिऊन शांत झोपी जाते. त्याची चिंता त्याच्या आईला असते. पण अशा तऱ्हेची काळजी-चिंता-विचार त्या लहान मुलाच्या मनामध्ये येत असतील का ? मनुष्यप्राण्याला मिळलेली विचार शक्ती या मुलांचे बाबतीतही शक्य आहे कां ? ही मुले चिंता न करता आपला भार सर्वस्वी दुसऱ्यावर टाकून जगत असतात.

अशी ही 'चिंता'. कांही लोक उगीचच शंकरासारखी (गंगा डोक्यावर) घेऊन वावरत असतात. अमेरिकेचे जागतिक व्यापार केंद्र नष्ट झाले आता युद्ध सुरु होणार ? महागाई भडकणार ? आता आपल्या भारताचे कसे होणार ? अशी चिंता आपल्या शिरावर घेऊन फिरत असतात. त्यामुळे स्वतः चिंतातुर होतातच, इतरांना सुद्धा चिंतातुर करतात. आणि स्वतःचे केस पांढरे करुन घेतात. चिंता करण्याची आवश्यकता आहे किंवा नाही हा गौण प्रश्न आहे. पण ते करतात हे शंभर टक्के सत्य आहे.

मनशांती, भयमुक्त जीवन, चिंतामुक्त अवस्था या करतां मनुष्यप्राणी आपल्या चिंतेचे गाठोडे बाजूला ठेवून बसू शकत नाही. कित्येकदा या चिंतेमुळे हृदरोग होऊन मनुष्य देहाचा त्याग करतो ! पण चिंता करणे सोडत नाही. चिंतायुक्त जीवन जगणे हे भाग्याचे लक्षण आहे. त्याहीपेक्षा येणाऱ्या दुःखाना सामोरे जाऊन त्याच्याशी यशस्वीपणे मुकाबला करणे आणि आपल्या चेहऱ्यावरील 'मुस्कान' कायम ठेवणे हे ज्यांना जमते ते जास्त भाग्यवान !!

''चिंता करुन चिंतीत होऊ नका ।

इतरांना चिंताग्रस्त करु नका ॥

प्रकृति चिंताजनक करु नका ।

चिंतेचे गाठोडे डोक्यावरुन खाली ठेवा ।

सर्वजण करतील तुमची सेवा ।

आणि तुम्ही करा चिंतेचा हेवा ॥

श्री. सुरेश देशपांडे

१/२ जान्हवी अपार्टमेंट,

चरई, ठाणे - ४०० ६०१.

दूरध्वनी : ५४३०९९८

•••

# 'मुक्काम नाणेघाट'

*नाणे घाटातील अनुभव. - संपादक*

तरुण मंडळींना पर्यटन म्हणजे जीव की प्राण. जरा कुठे दोन दिवस जोडून सुट्टी मिळाली की ही युवक मंडळी चालली पर्यटनाला. या पर्यटनाचे दोन प्रकार आहेत. एक आहे 'पिकनिक' ज्यात मुख्यत: प्रवास एखाद्या वाहनातून केला जातो; आणि मुक्कामाच्या ठिकाणी थोडीशी मौजमजा केली जाते. दुसरा प्रकार म्हणजे जंगलातून चालत जाणे. ज्याला आपण 'ट्रेकींग' म्हणतो. पाठीवर एक सॅक घेऊन युवक मंडळी घराबाहेर पडतात आणि प्रत्येक क्षण निसर्गाबरोबर घालवण्याची संधी त्याना मिळते. शिवाय शारिरीक क्षमतेची कसोटी यामध्ये लागते ती वेगळीच.

मुंबईच्या जवळपास अशी अनेक निसर्गरम्य ठिकाणे आहेत जेथे दोन दिवसांकरिता जाऊन आपण ताजेतवाने होऊ शकतो. असेच एक परतपरत जावेसे वाटणारे ठिकाण म्हणजे नाणेघाटाची गुहा. राजा 'रिसिमक्' याने खिस्तपूर्व काळात जुन्नर मधील घाटघर या गावाजवळ ही गुहा बांधली. त्या काळात या राजाची 'सातवाहन' नावाची Dynesty अस्तित्वात होती. आणि जुन्नर ही ऊपराजधानी होती. खिस्तपूर्व काळात सामानाची ने-आण करण्याकरिता गाढवं आणि घोड्यांचा ऊपयोग केला जायचा. त्यांच्या पाठीवर सामान लादून प्रवास होत असे. पूर्वीच्या काळी आजच्यासारख्या सोयी उपलब्ध नसल्याने सर्व प्रवास चालतच करावा लागत असे. अन्नधान्याची आणि इतर गोष्टींची ने-आण करण्यासाठी कल्याण ते वसई यामधील प्रवासाकरता नाणेघाटाचा उपयोग होत असे. त्या काळात या घाटात फारच वर्दळ असायची आणि सामानाची ने-आण करताना 'टोल' म्हणजेच जकात वसूल करण्यासाठी या गुहेचा उपयोग केला जायचा. गुहेच्या जवळच एक फुटलेला 'घडा' नजरेस पडतो. याचा ऊपयोग जकात वसूल करण्यासाठी केला जायचा. नाणेघाटच्या गुहेत जवळ जवळ ४० ते ५० माणस सहज झोपू शकतात. गुहेच्या बाजूलाच पाच कुंड आहेत आणि त्यात बारा महिने पाणि उपलब्ध असते. गुहेमधे अर्धमागधी भाषा आणि ब्रह्मी लिपीत सूचना लिहिलेल्या आढळतात. शिवाय भिंतीवर काही श्लोक आणि सूर्य, चंद्र, वायू, पृथ्वी इ. नावे कोरलेली आढळतात.

आता आपण नाणेघाटला जाणाऱ्या रस्त्यांची माहिती करून घेऊ. पहिला प्रकार म्हणजे बस किंवा खाजगी वाहनाने नाणेघाटला जाणे. यासाठी पुणे ते जुन्नर आणि जुन्नर ते घाटघर अशी बस आहे. घाटघरपासून साधारण एक तास चालल्यावर नाणेघाटची गुहा लागते. स्वत:चे वाहन असेल तर गुहेपर्यंत रस्ता आहे. ज्या लोकांना ट्रेकींगचा कंटाळा येतो किंवा सवय नसते अशांना हा प्रवास सोयीचा वाटतो.

परंतु माझी खात्री आहे की आजचे युवक दुसरा रस्ताच पसंत करतील आणि तो म्हणजे अर्थातच जंगलातून भटकंती. कल्याण(प) रेल्वे स्थानकासमोर माळशेज घाटातून मुरबाडला जाणारी बस सायंकाळी पाचपर्यंत मिळते. या बसने 'टोकवडे' गावात ऊतरावे लागते. पोटपूजा करून पाच किलोमीटर अंतर चालल्यावर जंगलातील वाट सुरू होते आणि मग चालू होतो तो कधीही न संपावा असं वाटणारा पायी प्रवास. आजूबाजूला जंगल, अनेक प्रकारची झाडे, चित्रविचित्र दिसणारे पक्षी आणि त्यांच्याशी केलेल्या गप्पा, मधूनच लागणारा पाण्याचा छोटासा ओहोळ यातून रमत गमत मार्गक्रमण करताना एका

वेगळ्याच विश्वात वावरल्याचा आनंद अनुभवास येतो.

साधारण तीन तास जंगलातून भटकंती केल्यावर आपण गुहेत पोहोचतो. गुहेजवळील कुंडात पाणी असल्याने लगेचच ताजेतवाने होता येते. नाणेघाटच्या जवळपास दुकाने, उपहारगृहे किंवा वस्ती नसल्याने सर्व गोष्टी आपल्यालाच वाळगायला लागतात. खाण्यापिण्याचे पदार्थ बरोबर घेऊन गेल्यास गुहेत शांतपणे बसून त्याचा आस्वाद घेता येतो. पण यापेक्षा एखादा अविस्मरणीय अनुभव हवा असेल तर एखादा छोटासा स्टोव्ह बरोबर घेऊन जाणे, त्यावर गरमागरम चहा आणि डाळतांदूळाची खिचडी करून संपूर्ण निसर्गाच्या सान्निध्यात त्याचा आस्वाद घ्यावा. त्यात जी मजा आहे तीच वर्णन करणं कठीणच.

गुहेमध्ये थोडीशी विश्रांती घेतल्यावर आजूबाजूला फिरण्यास आपण सज्ज होतो. नाणेघाटच्या मागच्या बाजूला एक छोटासा Eco Point आहे तर गुहेच्या बरोबर वरती एक सुळका आहे. त्यावर सहज चढून जाता येते. या सुळक्याला 'नानाचा आंगठा' असं म्हणतात. या सुळक्यावरून आजूबाजूचे छोटे सुळके आणि गड दिसतात. त्यात प्रामुख्याने खडा पारशी सुळका, जिवधन गड, सिद्धगड, हरिश्चंद्र गड इ. चा समावेश आहे.

रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून दोन दिवस मजेत घालवण्याकरता नाणेघाट हे योग्य ठिकाण आहे. या गुहेत कितीही वेळा गेले तरी समाधान होत नाही. गंमत म्हणजे वेगवेगळ्या ऋतूत नाणेघाटची वेगवेगळी रूपं आपल्याला पहायला मिळतात. उन्हाळ्यात कडक ऊन असल्याने शारीरिक क्षमतेचा अगदी कस लागतो. ज्याना कडक थंडीची मजा लुटायची असते त्यानी डिसेंबर - जानेवारीत नाणेघाटला जावच. तोंडातून वाफा पाडत गरम चहाचा घोट घेताना अख्खे जग जिंकल्याचा आनंद होतो. पावसाळ्यात मग हा घाट थोडस रौद्र रूप धारण करतो. 'पावसाने झोडपले' म्हणजे काय याचा अनुभव यावेळी आपल्याला येतो.

नाणेघाटासारखे अनेक घाट आणि गड आज तरुणांना खुणावत आहेत. अनेक प्रकारच्या निसर्गसंपत्तीचे वरदान आपणाला लाभलेले आहे. अशा स्थळांवरती एखादी दूरदर्शन मालिका सहज काढता येईल असा विचार येथे फिरताना मनात येऊन जातो. अर्थात निसर्गाला कॅमेराच्या चौकटीत बंदिस्त करणे अशक्य आहे एवढे मात्र खरं. या सर्व अनुभवात एकाच गोष्टीच वाईट वाटतं आणि ते म्हणजे इतर भागाप्रमाणे या भागात सुद्धा होणारी बेसुमार जंगलतोड. या जंगलतोडीचे वाईट परिणाम भावी पिढीला भोगायला लागू नयेत यासाठी काहीतरी ठोस उपाययोजना केली पाहिजे यात शंकाच नाही.

नाणेघाटला एका दिवसांत जाऊन परत येता येते. पण त्यासाठी फारच धावपळ करावी लागते. त्यापेक्षा गुहेत एखादी पौर्णिमेची रात्र घालवणे हे सर्वो उत्तम. नाणेघाटला रात्री मुक्काम करण्यास कुठलाही धोका संभवत नाही. एक रात्र राहून दुसऱ्या दिवशी निघाल्यास टोकवडे गावाहून कल्याणला येणारी बस सायंकाळी सात पर्यंत मिळू शकते. नाणेघाटात कोणत्याही वयातील मंडळी सहज जाऊ शकतात. घाटसुद्धा चढण्यास अतिशय सोपा आहे. शिवाय आजूबाजूला वस्ती नसल्याने निसर्गाच्या पूर्ण सान्निध्यात रहाण्याचा आनंद आपल्याला मिळतो. 'एवढं काय बुवा आहे त्या गुहेत बघण्यासारखं' असा प्रश्न आमची काही मित्रमंडळी आम्हाला विचारतात. यावर आमचं एकच उत्तर असेल आणि ते म्हणजे तुम्ही पण चला खांद्यावर 'सॅक' घेऊन नाणेघाटला. 'दूरून डोंगर साजरे' ही म्हण नाणेघाटच्या बाबतीत अजिबात लागू पडत नाही असा अनुभव तुम्हाला येईलच याबद्दल मला खात्री आहे.

**श्री. भालचंद्र बापट**
मोगल लेन, माहीम, मुंबई ४०० ०१६.

• • •

# ग्रंथालय व माहिती शास्त्र

## ठाण्यात उपलब्ध असणाऱ्या पदव्युत्तर स्तरापर्यंतच्या सुवर्णसंधी.

*ठाण्यात प्रमाणपत्र स्तरावरील ग्रंथालय व माहिती शास्त्रात अभ्यासक्रमापासून पदव्युत्तर स्तरापर्यंतच्या शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे त्या बद्दल.- संपादक.- संपादक*

व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये पूर्वी कधीही नव्हत्या इतक्या संधी ठाण्यात आज उपलब्ध झालेल्या आहेत. विशेषत: ग्रंथालय व माहिती क्षेत्रात याचा ठळकपणे अनुभव येतो.

या विषयाचे शिक्षण घेण्यासाठी एके काळी मुंबईला जाण्यावाचून पर्याय नव्हता. मात्र या विषयातील प्रमाणपत्र परीक्षेच्या अभ्यासक्रमापासून ते पदव्युत्तर स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्याच्या सोयी आज ठाण्यात उपलब्ध आहेत. माहिती प्रधान युगात या विषयाच्या व व्यवसायाच्या कक्षाही रुंदावत आहेत सूचीतज्ज्ञ, संगणक उपयोजनातील तज्ज्ञ अशा विशेषीकरणाच्या अभ्यासाची पार्श्वभूमी असणाऱ्या व्यावसायिकांची जगभरच मागणी वाढत आहे. त्यामुळे 'ग्रंथपाल म्हणजे ग्रंथांची देवघेव करणारे प्रशिक्षित कारकून ' ही पारंपरिक व संकुचित दृष्टी गेल्या वीस-बावीस वर्षात जगभरच आमूलाग्र बदलली आहे. नेमकी माहिती, नेमक्या वेळेला विश्लेषणासह उपलब्ध करून देणारे 'इन्फर्मेशन मॅनेजर्स' किंवा 'इन्फर्मेशन ॲनॅलिस्ट' या अभ्यासक्रमातून आज घडविले जातात. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण असणारांना शाळा महाविद्यालयाबरोबरच खाजगी उद्योग क्षेत्रातही व्यवसाच्या संधी काळाच्या ओघात वाढत चालल्या आहेत.

त्या दृष्टीने ठाण्यात या व्यवसायाचे शास्त्रशुध्द व मान्यताप्राप्त प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा हा त्रोटक परिचय.

**प्रमाणपत्र स्तरावरील प्रशिक्षण :**

ठाण्यामध्ये हे शिक्षण देणारी जुनी संस्था म्हणजे ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ. या संस्थेतर्फे गेली तीसहून अधिक वर्षे हे वर्ग चालविले जातात. गेली पंधरा वर्षे मी या तीन महिन्यांच्या (शॉर्ट टर्म कोर्स) अभ्यासक्रमाचे अध्यापकीय संयोजन करीत आहे. या दरम्यान सुमारे ६०% ते ७५% विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमामुळे व्यवसाय मिळल्याचे माझे निरीक्षण आहे. ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यकर्ते व वर्गाला अध्यापन करण्यासाठी येणारे तज्ञ ग्रंथपाल यांच्यामुळे महाराष्ट्र राज्य स्तरावर या वर्गाने अनेक रेकॉर्डस् निर्माण केले आहेत. ग्रंथपाल शासनाचे तज्ञ व रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. प्रदीप कर्णिक, बिर्ला महाविद्यालयाचे प्रा. सतीश डोंगरे, प्रा. चारुदत्त गणपुले, प्रा. विनय हावरे अशा अनेक नामवंत ग्रंथपालांच्या व्यावसायिक वाटचालीचा ओनामा याच वर्गात झाला आहे. प्रतिवर्षी अंदाजे, सरासरी ५० विद्यार्थ्यांनुसार आजवर दीड-दोन हजार विद्यार्थी या वर्गाने दिले आहेत. महाराष्ट्रभर हा अभ्यासक्रम सुमारे ३० केंद्रातून चालतो.

अशाच प्रकारचा शासनमान्यता असणारा हाच अभ्यासक्रम ठाण्यात राबविणारी आणखी एक महत्त्वाची संस्था म्हणजे कामगार कल्याण मंडळ या संस्थेत साधारणत: (८३-८४) पासून हे वर्ग चालतात व या संस्थेच्या अभ्यासक्रमाचा लाभ झालेले ही असंख्य विद्यार्थी ठाणे जिल्ह्यात आहेत. कामगार कल्याण मंडळाचीही महाराष्ट्रभर या अभ्यासक्रमाची चौदा केंद्रे आहेत.

**पदवी स्तरावरील शिक्षण :**

विद्या प्रसारक मंडळ हा दूरदृष्टीने काम करणाऱ्या व पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यांची ठाण्यातील जुनी व अग्रगण्य संस्था. एकूणच ग्रंथालय व ग्रंथपालन क्षेत्रासाठी या संस्थेने केलेले कार्य लक्षणीय आहे. एकतर ठाणे महाविद्यालय परिसरातील सर्व ग्रंथालये संगणकाद्वारे जोडून(LAN ) संगणकी करणाच्या दृष्टीने भरीव प्रयत्न केलेली ही ठाण्यातील पाहिलीच शिक्षण संस्था. त्याचबरोबर ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे पदवी स्तरावरील शिक्षण उपलब्ध करून देणारीही पहिलीच शिक्षणसंस्था.

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहिती शास्त्राच्या पदवी स्तरावरील अभ्यासाचे केंद्र चार वर्षापूर्वी संस्थेने संस्थेच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात सुरु केले. केंद्रप्रमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेली तीन वर्षे हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या चालू आहे. नोकरी करून शिकू इच्छिणारे, मातृभाषेतून शिकू इच्छिणारे तसेच प्रौढ विद्यार्थी यांची या केंद्रामुळे मोठी सोय झाली आहे. ठाणे जिल्ह्यातून पालघर पासून व कर्जत कसाऱ्या पर्यंतचे विद्यार्थी या अभ्यासासाठी ठाण्यात येतात.

याच दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या पूर्ण वेळेचा व इंग्रजी माध्यमातील अभ्यासक्रम मिळविण्याच्या दृष्टीने विद्या प्रसारक मंडळ सातत्याने प्रयत्नशील होते. विद्यापाठात संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार भेटून, पत्र व्यवहार करून विद्यापीठाच्या इतिहासात विद्यापीठाबाहेर प्रथमच हा अभ्यासक्रम मिळविण्यात विद्याप्रसारक मंडळाला यश आले मंडळाच्याच जोशी बेडेकर महाविद्यालयात संयोजित होणाऱ्या अभ्यासक्रमाचे हे तिसरे वर्ष असून पहिल्या दोन्ही वर्षांचे निकाल ८०% घरात लागले आहेत. प्राचार्य स. वा. गोखले यांचे या वर्गासाठी मार्गदर्शन लाभते. माननीय मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते या वर्गाचे औपचारिक उद्घाटन झाले होते.

वरील मराठी व इंग्रजी माध्यमांच्या दोन्ही पदवी स्तरीय, शासनमान्य अभ्यासक्रमांसाठी वर्षभर सातत्याने चौकशी व विचारणा केली जात असते. त्या दृष्टीने मुद्दाम संपर्काचा तपशील देत आहे.

**मराठी माध्यम** - विद्यापीठ - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
संपर्क - केंद्रसंयोजन व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक (१०.३० ते ५.३०)
दूरध्वनी : ५३३ ७६ ७२

**इंग्रजी माध्यम** - विद्यापीठ - मुंबई विद्यापीठ, मुंबई
संपर्क - अभ्यासक्रम संयोजन व जोशी बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे (९.०० ते ४.००) दूरध्वनी : ५३८ ४५ ९१

**पदव्युत्तर स्तर:**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या केंद्राची प्रगती व काम पाहून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या केंद्रासाठी मंडळाला विचारण्यात आले. विद्यापीठाच्या मानव्य शाखेचे संचालक डॉ. रमेश वरखेडे, अभ्यासक्रम संयोजक डॉ. शरद गणपुले व मुंबई विभागाचे विभागीय संचालक प्रा. चंद्रकांत भोंजाळ यांच्या समितीने महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्याप्रसारक मंडळाचे पदाधिकारी यांना भेट देऊन चर्चा केली. विद्याप्रसारक मंडळाने यास मान्यता देऊन यंदापासून ठाण्यात यापूर्वी कधीही नसणारी या विषयातील पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाची सोय उपलब्ध करून दिली.

(पान क्र. ३६वर)

# पारिभाषिक शब्दांचा अर्थ

*माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात वारंवार वापरले जाणारे शब्द, त्यांचे अर्थ यांची कल्पना यावी या दृष्टीने ही संकलित यादी क्रमशः देत आहोत. असे पारिभाषिक शब्द वापरताना त्यांचा अर्थ माहीत व्हावा हा त्यामागील उद्देश आहे या विषयाप्रमाणेच जीव तंत्रशास्त्रातील पारिभाषिक शब्द देण्याचा आमचा मानस आहे- संपादक*

**Fire Wall - फायर वॉल**

तुमची जी सिस्टिम असेल त्या भोवती जणु फायर वॉल बांधावी तशी ही फायर वॉल सिस्टिम काम करते. गाळणी लावून संदेश आत घेणे किंवा बाहेर पाठवणे यामुळे शक्य होते. इंटरनेटला कनेक्शन जोडून त्यावरून मिळणाऱ्या फाईल्सचेही सेन्सॉर होऊन फाईल बाहेरून आत येते.

**File Transfer Protocol (FTP) - फाईल ट्रान्सफर प्रोटोकॉल (एफ टी पी)**

एका संगणकावरून दुसऱ्या संगणकाकडे फाईल पाठविण्याची व्यवस्था.

**Flame - फ्लेम**

अपमानकारक संदेश.

**Free net - फ्री नेट**

विशिष्ट गटाच्या सभासदांना निःशुल्क इंटरनेटसेवा उपलब्ध करून देणारी संघटना.

**FTP Server - एफ् टी पी सर्व्हर**

हा इंटरनेटवरचा होस्ट कॉम्प्युटर. हा FTP वर वाचता येणाऱ्या फाईल्स वेगळ्या साठवून ठेवतो. या सर्व्हर द्वारे नवी फाईल नोंदवली जाईल. वा अस्तित्वात असलेलीच फाईल पाठवली जाईल.

**Gigabyte - गायगा बाईट**

एक अब्ज बाइटस्.

**Gopher - गोफर**

मेनूद्वारे इंटरनेटवरील विशिष्ट माहितीपर्यंत पोहोचविणारी सेवा.

**Hardware - हार्डवेअर**

म्हणजे खुद्द कॉम्प्युटरचे यंत्र, वायर्स, प्रिंटर, डिस्क, ड्राईव्हज्, मॉनिटर वगैरे.

**Highlighted - हायलायटेड**

इतर मजकुराच्या तुलनेत स्पष्ट केलेली माहिती. ही माहिती दुसऱ्या एखाद्या वेबसाईटचा सांधा असतो. हायलाईट केलेली माहिती पांढऱ्या पार्श्वभूमीवर काळी दिसते.

**Home page - होम पेज**

वेब साईट वरील प्रमुख पेज.

**Host - होस्ट**

इंटरनेटला जोडलेला संगणक

**HTML - एच् टी एम् एल्**

Hypor Text Mark up Language या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. वेब पेज तयार करण्यासाठी नेहमीच्या मजकुरात घातलेल्या विशिष्ट सूचना. या सूचनांमुळे वेब पेजेसमध्ये सांधे जुळविता येतात. व एका वेब पेजमधून दुसऱ्या वेब पेजमध्ये जाता येते.

**HTTP - एच् टी टी पी**

Hypor Text Transfer Protocol या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर.

**Internet - इन्टरनेट**

जगभर परस्परांना जोडण्यात आलेली नेटवर्क.

**Internet Service Provider - इन्टरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर**

व्यक्तिगत संगणक इंटरनेटला जोडून देणारी संस्था.

**IP - आय् पी**

Internet Protocol या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर.

**Infosic - इन्फोसीक**

तुम्ही दिलेला शब्द किंवा वाक्य किंवा नाव त्या आधारे वर्ल्डवाईड वेबची पाने चाळून त्यांचा शोध घेऊन तुम्हास सांगणारी पद्धती.

**Internet Explorer - इंटरनेट एक्सप्लोरर**

हा मायक्रोसॉफ्ट कंपनीचा एक वेब ब्राऊझर आहे.

**Internet Society - इंटरनेट सोसायटी**

जगातील सर्व समाजातील सर्वजणांनी इंटरनेटचा वापर, प्रसार व प्रचार कसा करावा व त्यात वाढ कशी करावी या कामात गढलेली ही सार्वजनिक संस्था आहे. हिचा पत्ता असा isoc@isoc.org.

**Inter Nic - इंटर निक**

हे इंटरनेट नेटवर्क इन्फर्मेशन सेंटर असून हिचे रजिस्ट्रेशन न्यूयार्क येथे होते व डिरेक्टरी सेवा न्यूजर्सीला मिळते.

**Internet Relay Chat - इंटरनेट रिले चॅट**

इंटरनेट प्रेमींना तात्काळ एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीसाठी एकमेकांशी संपर्क साधता यावा म्हणून निर्मिलेली व्यवस्था.

**ISDN - आय् एस् डी एन्**

इंटीग्रेटेड सर्व्हिसेस डिजिटल नेटवर्क या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून निर्माण केलेली गतिमान टेलिफोन सेवा.

**Jughed - जूगहेड**

गोफर स्पेस मधील विशिष्ट विभागातील माहिती शोधून देणारी सेवा.

**Killer app- किलर ॲप**

तंत्रज्ञानाचे अत्यंत यशस्वी प्रायोजन.

**Lan - लॅन**

Local Area Network चे संक्षिप्त रुपांतर.

**Link - लिंक**

वेबवरील एका माहितीचा दुसऱ्या माहितीशी असणारा सांधा.

**List Server - लिस्ट सर्व्हर**

आपोआप Mailing List पाठवणारा प्रोग्रॅम.

**Links - लिंक्स**

वर्ल्ड वाईड वेबसाठी केलेला प्रोग्रॅम. हा शेल अकौंट होल्डर्सकडे उपलब्ध असतो.

**Login - लॉगिन**

दूरच्या संगणकाशी संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रारंभ.

**Log out - लॉगआऊट**

दूरच्या संगणकाशी असलेला संबंध थांबवणे.

**Lurker - ल्युरकर**

न्यूजपेपरवरील केवळ संदेश वाचणारी व्यक्ती. ही व्यक्ती स्वतःचा संदेश कधीच प्रक्षेपित करत नाही.

**Mailix - मेलिक्स**

हे E- Mail च्या अनेक प्रोग्रॅमपैकी एकाचे नाव आहे.

**Mailing List - मेलींग लिस्ट**

ज्या लोकांना विशिष्ट विषयावरील चर्चेचे संदेश मेल सेवेमार्फत पाठवायचे आहेत अशांची यादी.

**Mail Server - मेल सर्व्हर**

इंटरनेटवर मेल सेवा देणाऱ्या कॉम्प्युटरचे हे नाव आहे. POP नावाचा प्रोटोकॉल वापरून तुम्ही तुम्हाला आलेली E-Mail उतरवून ठेवू शकता.

**Main Frame- मेन फ्रेम**

ह्याला IBM चा महाकॉम्प्युटर असे पर्यायी नाव वापरले जाते.

**Microsoft Network - मायक्रोसॉफ्ट नेटवर्क**

तुमचे जवळ विंडोज ९५ असेल तरच उपयोगाचे सुप्रसिद्ध मायक्रोसॉफ्ट कंपनीची यावर मालकी आहे. हे इंटरनेट कसे वापरायचे हे शिकून घेतले की झाले. याचा पत्ता असा billgates@msn.com.

**Mili Net - मिली नेट**

अमेरिकन संरक्षण खात्याचे स्वतंत्र नेटवर्क ! हे इंटरनेट पासून संरक्षित आहे.

**Multipurpose Internet Mail Extension - मल्टिपरपझ इंटरनेट मेल, एक्सटेंशन**

मजकूरासह चित्रे वगैरे E-Mail ने पाठवायची सुविधा.

**Modem - मॉडेम**

Modulator Demodulator या शब्दांचे संक्षिप्त रुपांतर. संगणक आणि टेलीफोन लाइन या मधील मध्यस्थ असणारे साधन. संगणकाच्या डिजिटल संदेशाचे ॲनोलॉगमध्ये व टेलीफोन लाइनवरून येणाऱ्या ॲनोलॉग संदेशाचे डिजिटलमध्ये रुपांतर करणारे साधन.

**Multimedia - मल्टिमिडिया**

ध्वनी, ग्रॅफिक्स, प्रोग्रॅम्स अशा विविध गोष्ट कार्यान्वित करणारी संगणक प्रणाली.

**Moderated Mailing List- मॉडरेटेड मेलींग लिस्ट**

मेलिंग लिस्ट जेव्हा मॉडरेटर द्वारा काम करेल तेव्हा त्या मेलिंग लिस्टला हे विशेषण लागेल.

**Moderated News Group - मॉडरेटेल न्यूज ग्रुप**

मॉडरेटरने चालवलेला न्यूज ग्रुप.

**Moderater - मॉडरेटर**

मॉडरेटर म्हणजे इतराना काहीतरी माहिती जाण्यापूर्वी तो तिच्या एक नजर फिरवतो व त्यांच्या मते Stupid माहिती तो गाळतो. Stupid म्हणजे off the topic किंवा offensive तसे हे सेंसॉरच.

**Mosaec - मोझॅइक**

वर्ल्डवाईड वेबवरचे काही वाचण्याचा चांगला प्रोग्रॅम. हा सर्वत्र मिळतो जसे मॅक, युनिक्स, विंडोज, तसाच हाही एक!

**Memory - मेमरी**

कॉम्प्युटरमधील माहिती संग्रहित केली जाणारी जागा.

**Net work - नेट वर्क**

परस्परांना जोडलेल्या अनेक संगणकांचे जाळे.

**News group - न्यूज ग्रुप**

चर्चा गट.

**New bie - न्यू बी**

सायबर स्पेसमध्ये नव्याने प्रवेश करणारी व्यक्ती.

**NNTP - एन् एन् टी पी**

Network News Transfer Protocol या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर युजनेटवरील आर्टीकल्स एका सर्व्हरवरुन दुसऱ्या सर्व्हरला पोहोचविण्यासाठी वापरला जाणारा प्रोटोकोल.

**Node - नोड**

इंटरनेटला जोडलेला संगणक/साधन.

**Operatiing System - ऑपरेटिंग सिस्टिम**

संगणकाचे संचालन करणारा प्रोग्रॅम.

**Packet - पॅकेट**

प्रक्षेपित करण्याच्या संदेशाचा एक लहान विभाग.

**Page (Pagenes) - पेज, (पेजनेस)**

पेज म्हणजे वेबवर कुणा एका व्यक्तिविषयी, उद्योगाविषयी, पद्धतीविषयी, संस्थेविषयी, वगैरे उपलब्ध असलेली माहिती. इंटरनेटवर नेहमीच्या पुस्तकातल्या पानासारखे खरेखुरे पृष्ट कधीच नसते.

**Password - पासवर्ड**

आपल्या गोष्टी गुप्त ठेवायच्या तर आपण गुप्त शब्द वापरतो. हा पासवर्ड अगदी सुलभ नसावा, बहुधा पासवर्डमध्ये अक्षरे व अंक यांचे मिश्रण ठेवतात. त्यामुळे तो तर्क दुर्लभ होतो.

**Password File - पासवर्ड फाईल**

ज्या फाईलमध्ये पासवर्डस कोडस साठवले जातात अशी फाईल. आय. एस. पी. सिस्टिम्स, हुषारी करुन हे पासवर्ड कोड नंबर स्वरुपात साठवतात. त्यामुळे जरी कुणी त्याही फाईलला ॲक्सेस मिळवला तरी त्याचा काहीच फायदा होत नाही.

**Pine Program - पाईन प्रोग्रॅम**

हा युनिक्स सिस्टिमला Mail म्हणून वापरायला सुलभ जातो.

**POP -पॉप**

पोस्ट ऑफिस प्रोटोकोल (POP) हा Mail Surver आहे. या प्रोग्रॅमच्या मदतीने तुमचा PC इंटरनेट वरुन तुम्हाला आलेली E-Mail जमा करतो.

**PPP - पीपीपी**

Point to Point Protocal या शब्दाचे संक्षिप्त रुपांतर. टेलिफोन लाईन आणि TCP/IP कनेक्शन यांचा सांधा जुळविणारा प्रोटोकोल.

(क्रमशः)

॥ श्री ॥

डोंबिवली
१-६-०२

प्रति,

आशा भिडे

अभिनंदन, स.न.

'दिशा' मासिकातील 'श्रीमद्‌भगवतगीता' (अध्याय दुसरा) ॥ सांख्ययोग ॥ हा आपला अप्रतिम लेख वाचला अभिनंदन. अगदी सोप्या भाषेत आपण या दुसऱ्या अध्यायाचे सार सांगितले आहे. उत्तम प्रबोधन करणारा आहे.

ग्रंथप्रसार या पत्राचे निमित्ताने माझ्या 'ग्रंथप्रसार' या चळवळीविषयी (छंदाविषयी) दोन शब्द सांगतो. ग्रंथ हे आपले गुरु आहेत हे सुवचन शिरोधार्य मानून गेली ४० वर्षे मराठी पुस्तकाचा/मासिकांचा (विशेषत: अंतर्नाद, मिळून साऱ्याजणी, प्रवाही, प्रेरक ललकारी या दर्जेदार मासिकांचा) विनोद सुविचार, सामाजिक-सांस्कृतिक चळवळींचाही प्रचार-प्रसार करीत आहे. प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक पुस्तकाचे नाव सर्वदूर पसरलेल्या मराठी माणसाच्या कानावर गेलेच पाहिजे ही माझी तळमळ आहे वर उल्लेखिलेली मासिके नियमितपणे आपल्या वाचनात येत असतीलच. ('ललित' हे ही त्यात आलेच) नसतील तर अवश्य वाचावीत प्रसार करावा हा आग्रह.

आजवर 'एक होता कार्व्हर' डॉ. अल्बर्ट स्वाईटझर 'शापित यक्ष', 'काळोखाची लेक' ३३ अनेक पुस्तकांचा प्रसार केलेला आहे. सांप्रत आपल्या ठाण्याच्याच मित्रवर्य कोशकार अरुण फडके यांच्या 'शुद्धलेखन तुमच्या खिशात' या शब्दसूचीचा व रंगा दाते (फलटण जि. सातारा) यांच्या 'एक ठिणगी आभाळभर' या कादंबरीचा मोठ्या हिरीरीन प्रसार करीत आहे. आपण ही कादंबरी (पद्मग्रंथ प्रकाशन) अवश्य वाचावी व श्री. दाते यांना आपला अभिप्राय कळवावा. आभार तसदीबद्दल क्षमस्व कळावे.

आ.

**प्रा. शरद जोशी** (ग्रंथप्रसारक)
सी/५, अमर कल्पतरु को. सो. देवी चौक,
शास्त्रीनगर, डोंबिवली (प). जि. ठाणे - ४२१ २०२.

• • •

माणसाजवळ विचार हे मोठे शस्त्र आहे. जो विचार करतो व प्रयत्नशील राहतो. त्याला पराभवाचे तोंड पाहावे लागत नाही. खरं, म्हणजे यश आणि अपयश यांच्यातील सीमारेषा अगदी अस्पष्ट आहेत. या दोन्ही रेषांमध्ये फारसा फरक नाही. मोती मिळविण्यासाठी सागराच्या तळाशी पाणबुड्या बुडी मारण्याचे धाडस करतो की नाही. यशाचा मोती मिळवण्यासाठी असेच धाडस हवे.

# उपयुक्त माहिती

रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांची समस्या ही आपल्याकडे सातत्याने वाढणारी बाब आहे झाली आहे व याचे कारण गेल्या काही वर्षात बेरेमाप वाढलेली वाहन संख्या हे आहे. ठाणे मुंबई सारख्या शहरी भागात नसणारी योग्य अशा रस्त्यांची सोय आणि ही वाढती वाहन संख्या ही तर गंभीर बाब आहे. त्यामुळेच वहातुक व्यवस्थापन व नियमन ही अतिशय अग्रक्रमाने लक्ष पुरविण्याचा विषय ठरत आहे.

१९५१ साली मुंबई शहरात नोंदणीकृत अशी ३५००० वहाने होती तर १९९४ मध्ये हीच संख्या ६,५९,६४७ इतकी झाली. ज्या प्रमाणात (सुमारे २०पट) वाहनांची संख्या वाढली त्या प्रमाणात रस्त्यांच्या विकास, रुंदीकरण, लांबी यांच्यात वाढ झाली नाही. औद्योगिक क्षेत्रात झालेल्या भरमसाठ वाढीमुळे, रुपयाच्या अवमूल्यनामुळे व 'पैसा' विषयक दृष्टिकोणाची व्याप्ती बदलल्यामुळे ठाणे व ठाणे शहर परिसरात नवश्रीमंतांचा एक मोठा वर्ग गेल्या काही वर्षात उदयास आला व मुंबईप्रमाणेच ठाणे शहरातील वाहन संख्या कैक पटींनी वाढली. साहजिकच अपघातांची संख्याही वाढली.

मेसर्स डब्ल्यू. एस्. ॲटकिन्स या आंतरराष्ट्रीय वहातुक व्यवस्थापन व नियोजन तज्ज्ञांनी अलीकडेच मुंबई शहरातील वहातुकीसंबंधी तयार केलेला अहवाल अतिशय सूचक आहे. अपघातांचे वाढते प्रमाण आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने या अहवालात वहातुक पोलीस खात्याचे कार्यक्षम नियोजन केले जावे, सिग्नलस् व वहातुक विषयक सूचना फलकांची योग्य त्या प्रमाणात काळजी व व्यवस्था ठेवली जावी व सर्वात महत्त्वाचे म्हणजे वहातुकीविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जावे अशा सूचना केल्या आहेत.

ठाण्यासारख्या गजबजलेल्या शहरातील वहान अपघातांचे सर्वसामान्यतः चार वर्गात वर्गीकरण केले जाते. अत्यंत प्राणघातक हा त्यातील पहिला प्रकार. यात व्यक्तीचा जीव दगवण्यात अपघाताची परिणती होते. गंभीर अपघात या दुसऱ्या प्रकारच्या अपघातात व्यक्तीला गंभीर इजा/दुखापत होते. नगण्य अपघात या प्रकारात व्यक्तीला किरकोळ दुखापत होते व लहान सहान उपचारांनी ही दुखापत बरी होते. चौथा प्रकार किरकोळ अपघात. या प्रकारात कोणालाही दुखापत होत नाही. शहरातील रस्त्यांचे आजचे स्वरूप इतके धोकादायक आहे की बरेचसे अपघात पहिल्या दोन प्रकारचे असतात. मुळात अपघात या शब्दाची व्यापक व्याख्या ' स्वतःची कुठलीही चूक नसताना ज्या घटनांमुळे मनुष्याला इजा किंवा हानी पोहचते, क्वचित मृत्यूही येतो असे म्हणतात.' अशे विश्वकोशात (खंड क्र.१, पृ. २७५) आढळते. रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची व्याख्या करावयाची झाल्यास ती पुढीलप्रमाणे करता येऊ शकेल, ' जनतेस खुल्या असणाऱ्या रस्त्यावर अकल्पितपणे घडणाऱ्या व जिची परिणती मृत्यू वा इजा होण्यात झाली आहे आणि जिच्यात एक किंवा अधिक वाहने गुंतलेली आहेत अशा घटनेस रस्त्यावरील अपघात म्हणता येईल.'

•••



# परिसर वार्ता

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा सुशांत हुकेरी विज्ञान शाखेत पंधरावा

ठाणे, दि. - येथील बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा बारावीचा निकाल. ९४.६५% लागला असून सुशांत हुकेरी (६०० पैकी ५४३ - ९०.५०%) मुंबई विभागाच्या विज्ञान शाखेच्या गुणवत्ता यादीत १५वा तर महाविद्यालयातून सर्वप्रथम आला आहे.



सुशांत मिलींद हुकेरी

मार्च २००२ मध्ये झालेल्या या परीक्षेस महाविद्यालयातून ४११ विद्यार्थी बसले होते त्यापैकी १६८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, १४१ विद्यार्थी प्रथम वर्गात, ७१ विद्यार्थी द्वितीय वर्गात तर ९ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत उत्तीर्ण झाले.

महाविद्यालयातून रचना अग्रवाल व पूनम वैष्णव ५३२ गुण मिळवून द्वितीय क्रमाकाने तर प्रियांका दळवी व संदीप दवणे ५३१ गुण मिळवून तृतीय क्रमाकाने उत्तीर्ण झाले. गणित या विषयात हुकेरीस व आदित्य शहा यास १०० तर संदीप दवणेस पदार्थ विज्ञानात व मिलींद पाटील यास रसायन शास्त्रात १०० गुण मिळाले.

हुकेरीसह सर्व उत्तीर्णांचे प्राचार्य सी. जी. पाटील, पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी अभिनंदन केले आहे.

## संदीप सावंत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सहावा

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील संदीप सावंत हा संख्याशास्त्र विषयातील विद्यार्थी ८६.८८ टक्के गुण मिळवून मुंबई विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सहाव्या क्रमांकावर आला आहे. त्याला ८०० पैकी ६९५ गुण मिळाले. या महाविद्यालयातून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आजवर अनेक विद्यार्थी चमकले असून महाविद्यालयास त्यांचा सार्थ अभिमान आहे असे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी सांगितले. संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अशोक पाटील व त्यांचे सहकारी प्राध्यापक यांनी व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी संदीपचे हार्दिक अभिनंदन केले आहे.



संदीप सावंत

जोशी बेडेकर महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचा निकाल अलीकडेच घोषित करण्यात आला असून १००० पैकी

५७९ गुण मिळविणारा आदित्य केळकर सर्व प्रथम आला आहे. मुंबई विद्यापीठाच्या पूर्ण वेळ असणाऱ्या या अभ्यासक्रमाचे हे महाविद्यालयातील दुसरे वर्ष असून या वर्षी ८०.७७ विद्यार्थी (२६ पैकी २१) उत्तीर्ण झाले.

या महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले व अभ्यासक्रमाचे संयोजक, महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

**बी.एस्.सी.:**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा (पदवी) निकाल ८६.७२ % लागला असून विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सहाव्या क्रमांकावर असणारा संख्याशास्त्र विषयाचा विद्यार्थी महाविद्यालयातून प्रथम आला आहे. महाविद्यालयातून बसलेल्या २४१ पैकी २०९ विद्यार्थी उत्तीर्ण घोषित करण्यात आले. विषयवार महाविद्यालयात सर्वप्रथम आलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे -

रसायनशास्त्र - पायल चंदन

प्राणिशास्त्र - रजनी सागर

गणित - कश्मिरा भोसले

वनस्पतिशास्त्र - राणी सिंग

पदार्थविज्ञान - शोभन शेट्टी

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य सी. जी. पाटील व पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी अभिनंदन केले आहे.

**एम्. लिब्. :**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विद्याप्रसारक मंडळातर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाचे पदवी अभ्यास केंद्र चालविण्यात येते. या केंद्राचे हे चौथे वर्ष असून पहिल्या दोन वर्षांचा निकाल अतिशय उत्तम लागला आहे. तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निकाल अपेक्षित आहे.

यंदा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे याच अभ्यास केंद्राला या विषयातील निष्णात (पदव्युत्तर) परीक्षेचे वर्ग देण्यात आले असून त्यासाठी वीस विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या मानव्य शाखेचे संचालक डॉ. रमेश वरखडे, राज्यस्तरीय अभ्यासक्रम समन्वयक डॉ. शरद गणपुले व विभागीय संचालक प्रा. चंद्रकांत भोंजाळ यांच्या समितीने महाविद्यालयास या संदर्भात भेट देऊन व विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर तसेच प्रभारी प्राचार्य डॉ. सौ. पेजावर यांच्याशी चर्चा केली होती. या वर्गांचे औपचारिक उद्घाटन लवकरच करण्यात येईल अशी माहिती अभ्यास केंद्राचे प्रमुख प्राचार्य सी. जी. पाटील यांनी दिली.

**कला वाणिज्य महाविद्यालय :**

**बारावीचा निकाल -**

महाविद्यालयातील दोन शाखांचा निकाल असा -

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | सोनाली मुळ्ये | ७५.१७% |
| द्वितीय क्रमांक | बरखा माल्यणकर | ७४.१७% |
| तृतीय क्रमांक | मधु पवार | ६७.००% |

**वाणिज्य शाखा -**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | शिप्रा आरोरा | ८१.३३% |
| द्वितीय क्रमांक | रेश्मा देसाई | ८१.१७% |
| तृतीय क्रमांक | शर्मिष्ठा वाटुगले | ७९.६७% |

**पदवीस्तराचा निकाल -**

कला शाखा - (B.A.)

३७५ विद्यार्थ्यांपैकी ३३६ विद्यार्थी उत्तीर्ण

उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.६०%

प्रथम श्रेणी ४५

द्वितीय श्रेणी २३६

उत्तीर्ण श्रेणी ५५

प्रथम क्रमांक - निकिता शाह ६९.३३% (तत्वज्ञान)

द्वितीय क्रमांक - क्युरी डिसूझा ६९% (तत्वज्ञान),

मानसी सावे ६९% (राज्यशास्त्र)

तृतीय क्रमांक रेखा जयस्वाल ६८.३३% (तत्वज्ञान)

**तत्त्वज्ञान विषयाचा निकाल १००%**

(बसलेले वीसही विद्यार्थी उत्तीर्ण) विषयावार टक्केवारी

तत्त्वज्ञान - १००%
भूगोल - ९५.९४%
इतिहास - ९३.४४%
हिंदी - ९२.८५%
मराठी - ९२.५१%
राज्यशास्त्र - ९१.१३%
अर्थशास्त्र - ८४.६१%
इंग्रजी - ७१.४२%
अर्थ व संख्याशास्त्र - २५%

**वाणिज्य शाखा**

उत्तीर्णतेची टक्केवारी ७५.३०% महाविद्यालय

६४.१५% विद्यापीठ

प्रथम श्रेणी ११५

द्वितीय श्रेणी १९०

उत्तीर्ण श्रेणी ६१

४८६ विद्यार्थ्यांपैकी ३६६ विद्यार्थी उत्तीर्ण

प्रथम क्रमांक - केदार जगताप ८१.७१%

द्वितीय -विभा सदानी ७८.२८%

तृतीय क्रमांक - क्रांती यंदे ७६.८५%

महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

**प्रा. मोहन पाठक**

• • •

**ग्रंथालय व माहिती शास्त्र**
**ठाण्यात उपलब्ध असणाऱ्या पदव्युत्तर**
**स्तरापर्यंतच्या सुवर्णसंधी.**

(पा क्र. २७ वरून)

माझे स्नेही प्रा. नारायण बारसे व मी आमचे प्राचार्य, विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ . विजय बेडेकर व इतर सर्व पदाधिकारी तसेच दोन्ही विद्यापीठातील अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने या वर्गाचे काम पहात आहोत. या संदर्भात कोणतीही माहिती लागल्यास वरी संपर्क पत्त्यावर आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन आहे.

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे - ६०१

• • •